# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५९**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ८ / जुलै २००२

## संपादकीय

## आपलेच ओठ आपलेच दात

ठाणे शहरात सुमारे दोन लाख बेवारशी कुत्री असून मागील दोन वर्षात २१,००० नागरिकांना अशी कुत्री चावल्याच्या घटना घडल्या आहेत. ही बातमी वाचून 'डोके चालेनासे होते' म्हणजे काय ते कळेल. ठाण्याची जी गत तीच देशातल्या सर्व खेड्यांची, गावांची आणि शहरांची आहे. हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही तर अतिशय गुंतागुंतीचा आहे.

या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करावे म्हणजे त्यांचे प्रजनन थांबेल असा एक उपाय सांगितला जातो व एका कुत्र्याच्या निर्बिजीकरणाला १,५०० रु. पडतील अशीही माहिती सदर बातमीत आहे. एकीकडे पैसे नसल्याची ओरड, तिजोरी रिकामी झाल्याची रड आणि दुसरीकडे पैशांचा असा वापर.... यात कोणतीही संगती लागेनाशी होते.

नागरी प्रशासनासमोर हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. या भटक्या कुत्र्यांवर कारवाई करून त्यांना मारून टाकणे याला कायद्याने बंदी आहे. हा भूतदयेचा कायदाही सामान्य माणसाच्या बौध्दिक आकलना पलिकडचा आहे. अशी भूतदया दाखवायची तर उंदीर, घुशी, झुरळे, डास या सर्वांप्रती दयाच दाखवावी लागेल. माणसाला उपद्रवकारक ठरणाऱ्या अशा प्राणी व कीटकांबद्दल भूतदया का व कशासाठी दाखवायची हे समजणे अवघडच आहे.

पूर्वी अशी भटकी कुत्री पकडण्यासाठी 'डॉग व्हॅन' येत असे. अशी कुत्री पकडून त्यांना विष घालून मारून टाकले जाई. पण आता ही संकल्पना बदलली आहे व कायद्याने अशी कुत्री मारण्यास बंदी आहे. काही दिवसांनी या कुत्र्यांच्या राज्यात माणसे जीव मुठीत धरून जगली तरी चालेल पण कुत्र्यांच्या पिलावळी वाढत राहिल्या पाहिजेत.

आपल्या जीवनात, समाज जीवनात अशा विसंगती ठासून भरल्या आहेत. कोणालाच त्यांचा विचार करायला वेळ नाही, विचार करण्याची गरज वाटत नाही. अंतर्मुख होणे म्हणजे काय हे आपण विसरत चाललो आहोत. असे कायदे करणारेही आपणच व त्यामुळे भोगावी लागणारी दुःखे भोगणारेही आपणच ! आहे हे असे आहे !!

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ८ / जुलै २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय ४ था) ॥<br>॥ ज्ञानकर्म संन्यास योगः ॥ | आशा भिडे | ३ |
| २) | भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा (आय.ए.एस.)<br>देशातील सर्वोच्च सरकारी सेवेचा राजमार्ग ! | प्रा.अनिल भावड | ७ |
| ३) | स्वामी विवेकानन्द | शं. बा. मठ | १४ |
| ४) | हॅनोई : राखेतून निर्माण झालेले शिल्प | डॉ. नागेश शं. टेकाळे | १७ |
| ५) | रामकृष्ण मठ (ग्रंथालय) | सुधीर बोरकर<br>मेघा हेमंत खरे | २० |
| ६) | भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊ पाहत आहे का ? | श्री. प्रभाकर द. आरदकर | २५ |
| ८) | एकादशी | सौ. वंदना प्रसादे | २८ |
| ९) | आंतरराष्ट्रीय पर्वत वर्ष व<br>एव्हरेस्ट मोहिमेचा सुवर्णमोहत्सव - २००२ | श्री. अरुण ठाकूर | ३० |
| १०) | पारिभाषिक शब्दांचा अर्थ | | ३२ |
| ११) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३५ |

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१
५४१ ३५ ४६

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्रीमद्भगवत् गीता (अध्याय ४ था) ।। ज्ञानकर्म संन्यास योगः ।।

*गीतेच्या तिसऱ्या अध्यायावरील लेखानंतर ज्ञानकर्म संन्यास योग या चौथ्या अध्यायावर सौ. भिडे यांनी पाठविलेला लेख देत आहोत. - संपादक*

प्रत्येकाला कर्म करणे आवश्यक आहे असा निर्णय भगवंतानी ३ऱ्या अध्यायात केला. कर्म आचरित असता 'अज्ञान' घालवून मोक्षापर्यंत जाण्यासाठी ब्रह्मार्पण बुद्धीने कर्म करणे जरुरी आहे. शरीर, वाणी, मन या द्वारा जे विहीत कर्म उत्पन्न होईल. ते ईश्वराप्रीत्यर्थ करणे जरुरी आहे. ही उपासना कशी करावी हे भगवंतानी ४थ्या अध्यायाच्या शेवटी सांगायला आरंभ केला आहे. या अध्यायापासून १२व्या अध्यायाच्या १३व्या श्लोकापर्यंत गीतेतील 'उपासना कांड' आहे असे ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे.

इथे अर्जुनाने प्रश्न केला नसतानाही त्याच्या वरलच्या अत्यंतिक प्रेमाने भगवंत स्वतःच बोलायला सुरुवात करतात. '' अर्जुना तुला जो अविनाशी नि कधीही क्षीण न होणारा कर्मयोग सांगितला तो यापूर्वी मी सूर्याला सांगितला. त्याने मनूला व मनूने इक्ष्वाकूला सांगितला. (आपल्या मुलाला) परंपरागत चालत आलेला हा योग राजर्षी जाणत होते. परंतु हा 'योग' कालौघात लुप्त झाला. लोक देवापेक्षा देहावर प्रेम करु लागले. विषयासक्त झाले. त्यामुळे 'योगा' चा विसर पडला. तोच पुरातन कर्मयोग तू माझा जिवलग मित्र, परम भक्त म्हणून तुला सांगितला.''

आता अर्जुन गोंधळला ''भगवंता तुझा जन्म तर आताचा मग तू पूर्वी सूर्याला कसा 'योग' सांगितला म्हणतोस ? मला कळेल असं बोल ना ! '' अर्जुनाचा हा प्रश्न स्थूल देहाला धरून होता. भगवंत आत्म्यांच्या पातळीवरुन बोलत होते.

' हे बघ अर्जुना अरे माझे तुझे आणि इतर सर्वांचेच अनेक जन्म होऊन गेले आहेत. ते मी व आत्मज्ञानी पुरुष जाणतो. पण तू व इतर जाणत नाहीत. जे कोणी माझे सर्व जन्म जाणतात ते मोक्षपदाला प्राप्त होतात.

''भगवंत आहेच, असतोच, नाही असे नसतेच. तो सर्व विश्वात भरलेला आहे. तो प्रकृतीचा (प्रगट झालली ज्ञानशक्ती) अंगीकार करुन सगुण साकार रुप धारण करतो. विश्वशक्ती अशी काही कार्यासाठी देहात अवतरते. (खाली येते) अधर्माचा नाश व संतांचे संरक्षण करण्यासाठी भगवंत अवतार घेतो.

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥४-७

परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥ ४-८

(दूरदर्शनवरील 'महाभारत' मुळे हे श्लोक लहान मुलांना सुद्धा पाठ झाले होते.)

सारे विश्व ज्या नियमांनी चालते त्या नियमांना धर्म म्हणतात. पण ह्या नियमांचे उल्लंघन होऊन जेव्हा समाज जीवन विस्कळीत होते. त्यावेळी ही विस्कटलेली घडी पुन्हा व्यवस्थित बसविण्यासाठी भगवंत अवतार घेतात.

वस्तुतः ब्राह्मणादी चार वर्णातील माणसे एकच. परंतु प्रकृतिजन्य गुणातील भेदाप्रमाणे मी त्यांची चार वर्णांत विभागणी केली. त्या गुणभेदा प्रमाणे त्यांना कामे वाटून दिली. गुण व कर्म यांच्या विभागाने मी चातुर्वर्ण्य निर्माण केले.

१) सत्वगुण जास्त ते ब्रह्मज्ञान जाणणारे, बुद्धीमान ब्राह्मण

२) लढवैये, क्षात्रतेज असलेले रजोगुणी ते क्षत्रिय

३) व्यवहार कुशल, व्यापार जाणणारे सत्वगुणी पण रजोगुण जास्त असलेले वैश्य वाणी.

४) बुद्धी कमी पण ताकद जास्त असलेले, मजबुत शरीरयष्टीचे तमोगुणी, जास्त रजोगुण असलेले ते शुद्र.

परमात्म्याचे एकत्व भंग न देता कार्यांच्या सोयीसाठी चारात विभागणी गुण कर्मांनी आपोआप झाली. त्यामुळे त्याचा कर्ता मी नाही. देहाचे कार्य चालावे म्हणून जसे डोके, हात, पोट, पाय ही कार्य विभागणी. तरी प्रत्येक अवयव वेगळा नसतो सर्व मिळून एक देह.

राष्ट्राचे, समाजाचे कार्य चालावे म्हणून नाही का प्रान्तवार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री निवडले जातात. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, उपसेक्रेटरी नेमले जातात. सर्वांच्या मदतीने राष्ट्राचे, समाजाचे वा संस्थेचे कार्य चालते. तरी राष्ट्र एकच असते. समाज वा समाज संस्था एकच असते. तसेच. लग्नकार्यातही कार्य उत्तम व्हावे म्हणून कामे वाटली जातात. तरी लग्न एकच असते. मी एकात्म परमात्मा. माझीच सर्व लेकरे. भगवंताला कर्मातच आनंद. त्याला कर्मांचे फळ अपेक्षित नाही. तरी जग चालावे, लोकांनी त्याचा आदर्श पुढे ठेवून कर्मे करावीत म्हणून भगवंत कर्मे करतात. कर्मयोगी, ज्ञानयोगी लोकांनाही आपल्या कर्मांचा आदर्श लोकांपुढे ठेवावा. फलासक्ती अहंभाव त्यांच्याठायी नसल्यामुळे त्यांना कर्मबंधन बाधीत होत नाही.

जो स्वत:साठी कुठलेही कर्म करीत नाही त्याला कर्माचा लेप लागत नाही. जसा देशाच्या स्वातंत्र्यासाठी शत्रूला मारणारा सैनिक, खुन्याला फाशी देणारा न्यायाधीश पापी ठरत नाही. कारण त्या कर्मात त्यांचा स्वार्थ नसतो.

बाबारे, कर्मांचे ज्ञान होणे कठीण पण मी तुला समजावून सांगतो. कर्म-विकर्म-अकर्म म्हणजे काय हे ही लक्षात घे. विद्वान लोकही हे कर्मांचे गूढ जाणू शकत नाही. कारण 'गहना कर्मणोगतिः ।'

कर्म-स्वधर्म-कर्म

विकर्म-उचित विशेष असे विहीत कर्म (मन ओतून केलेले)

अकर्म-विकर्मात कर्तृत्वभावाचा त्याग म्हणजे अकर्म. प्रेम व श्रद्धेतून, भक्तीतून कर्म, कर्म केल्यासारखे वाटत नाही.

कर्मात, मन ओता = विकर्म

दगडाच्या देवाला भावनेतून देवत्व येतं. विवेकानंद मूर्तीला, चित्राला देव मानायला तयार नव्हते. रामकृष्ण परमहंसांनी त्यांच्या आजोबांच्या तसबिरीवर त्यांना थुंकायला सांगितले. ते रागावले म्हणाले ही माझ्या आजोबांची तसबिर आहे. रामकृष्ण म्हणाले 'आता का? कागदाचा तो तुकडा आहे ना! मग थुंक की! पण नाही ना थुंकत तू कारण त्यामागे तुझी भावना आहे. या भावनेलाच महत्त्व आहे. त्यामुळेच दगडाला देवत्व, कागदाच्या कपट्याला वजन प्राप्त होतं.

देवासमोर मी अभिषेकाला बसलो पण मन तिथे नसेल तर एका दगडासमोर दुसरा दगड बसलाय एवढाच अर्थ उरेल. भावनेने भक्तीभाव निर्माण होईल. आपण उपवास केला पण मन जर भोजनाची स्वप्ने रंगवीत असेल तर काय अर्थ देह व मन दोन्ही साधनांनी तपस्या करायची आहे. देहाने तप केले तर मनाने जप व्हायला हवा तरच साध्य साधता येईल.

विकर्मात कर्तृत्व भावाचा त्याग केला की अकर्म. अपत्यप्रेमापायी आईला मुलाला जन्म देण्याचे व वाढविण्याचे कष्ट वाटत नाही. अकर्म हे सहज कर्म होते. त्यात कर्तृत्वाचा लेशही नसतो. कर्म करुनही केल्यासारखे न वाटणे.

अकर्म म्हणजे कर्म न करणे असे नाही. कारण कर्म न करणे हेही एक कर्मच होते. म्हणून विद्वान लोक कर्म करुन कृर्तत्वाचा व आसक्तीचा त्याग करतात. अशा कर्मांचे अकर्म होते. कर्मे करावीत मनाने संतुष्ट असावे. हर्ष शोकाच्या द्वंद्वांच्या पलीकडे, समभाव स्थिरबुद्धी असावी. कर्मे परमेश्वराला अर्पण करून हे कर्तृत्व माझे नाही.

त्यामुळे फळावरही माझा अधिकार नाही. हाच यज्ञ. जीवनातील प्रत्येक कर्म हाच एक यज्ञ व्हावा असे गीतेला वाटते. देह आहे तोवर देहाची कर्मे होणारच. पण ती कर्मे आसक्ती रहित व मनावर ताबा ठेवून करायला हवीत. देह जगवण्यासाठी भोजन आवश्यक. पण अमुकच हवे असे इंद्रियांचे चोचले नकोत. इंद्रियाधीन न होता इंद्रिये स्वाधीन हवीत. जे प्राप्त होईल त्यात सुख मानावे. 'ठेविले अनंते तैसेची रहावे चित्ती असू द्यावे समाधान ।' ही तुकारामाची उक्ती अंगीकारावी.

कर्माचे नैष्कर्म्य होण्यासाठी बुद्धी आत्मज्ञानात स्थिर हवी. म्हणजे द्वंद्वातीत व्हायला हवी. परमेश्वराला कर्मे अर्पण करुन हे माझे नाही म्हणणे म्हणजेच यज्ञ! आमच्या शेजारच्या जेमतेम एस्.एस्.सी. झालेल्या मुस्लीम बाई नेहमी अध्यात्म बोलायच्या. 'सार अल्लातालानं दिलयं. माझं काहीच नाही. बच्चे भी हमारे नही, उसके है । सम्हालने वाला वो है । आपण फक्त त्याचे नाव घ्यायचे. मै तो अल्लाको कहती हूँ वो पहिले सबको सुखी रखे बाद में मुझे । वो जिसको चोंच देता है उसको चारा भी देता है ।' काही चांगलं झालं की त्या हात वर करुन म्हणायच्या अल्ला देता है सबको। त्यांना 'ईद मुबारक' आम्ही करायचं व त्या 'दिवाळीला' आम्हाला 'Happy Diwali' करायच्या. आमच्या गणपतीच्या दर्शनाला यायच्या. त्यांच्या बहुला मी मुलगीच मानलं होतं नि तिच्या मुलाला नातू. तो गणपतीत आमच्याकडेच रहायचा दिवसभर, टाळ वाजवून 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या म्हणायचा' त्या नेहमी म्हणायच्या भगवान, अल्ला एकच आहेत. हे तत्त्वज्ञान परवेज मुशर्रफ यांना समजलं तर भारत पाक सीमेवर चकमकी कशाला उडतील ! नि जीवीत हानी कशाला होईल! अशावेळी भगवंताने अवतार घेण्याची वेळ आलीय.

कर्मात अकर्म पाहणे हेच ज्ञानी माणसाचे लक्षण. विश्वगती व व्यक्तीगत कर्मे ही जर यज्ञ संकल्पनेतून आचरली गेली तर ती सारी परमात्म्यात विलीन होतात. असा गहन अर्थ ज्ञानेश्वर सूचित करतात.

यज्ञाचे अनेक प्रकार २५ ते ३३ या श्लोकांमध्ये सांगितले आहेत.

१) द्रव्य यज्ञ - यात वस्तूचे हवन
२) तपो यज्ञ - यात कामनांचे हवन
३) योग यज्ञ - यात वासनांचे हवन
४) स्वाध्याय यज्ञ - यात अज्ञानाचे हवन
५) ज्ञान यज्ञ - यात अहंकाराचे हवन

'स्वधर्म' हाच यज्ञ, त्यात कामनांची आहुती द्यायची, कर्तव्य बुद्धीने स्वधर्माचरण, अहंकाराची आहुती. हा स्वधर्माचरण यज्ञ करतांना जी सुख दुःखे प्राप्त होतील त्याचा यज्ञातील अमृत समजून स्वीकार करणे (आनंदाने). त्यामुळे चित्तशुद्धी होईल. यज्ञातून जे शिल्लक राहील ते यज्ञशिष्ट खरे. शुद्ध चित्त म्हणजेच 'अमृत' हेच यज्ञाचे रहस्य. चित्तशुद्धीने 'आत्मदर्शन' होते. परमात्मप्राप्ती होते. प्रत्येकाच्या अंतरात आत्मज्योत असतेच. फक्त मलिन चित्तामुळे तिचा प्रकाश दिसत नाही.

सर्व यज्ञांचा हेतू 'मनोमल नाश' हाच. जीवन यज्ञमय नसेल तर इहलोकी सुख मिळणार नाही. मग परलोकी तर नाहीच. स्वधर्म हाच यज्ञ. स्वधर्मा खेरीज अन्य कर्म-यज्ञ होऊच शकत नाही. पूर्वी यज्ञकुंड पेटवून त्यात धान्य, तुपाची आहुती देत म्हणजे जडद्रव्याची. या पेक्षा, संयम, स्वाध्याय, तप, प्राणायाम, योग हे अंतरिक चालणारे यज्ञ हे ज्ञानमय यज्ञ होत. यात 'अग्नि आणि हवन' ही जडद्रव्ये नाहीत तर ब्रह्माग्नी, संयमाग्नी, योगाग्नी, इंद्रियाग्नी असे अग्नि सांगितले आहेत. सारेच कर्म ज्ञानात परिणत झाले की संपते. आत्मज्ञानातून कर्मे संपवून टाकणे हेच जीवनाचे एकमेव उद्दिष्ट व्हावे ! मानवी जीवनात 'ज्ञान' हेच सर्वश्रेष्ठ जीवनमूल्य व्हावे. ज्ञानी लोकाकडून ज्ञान मिळवावे असे तुला जर वाटत असेल तर त्यांना विनम्रपणे शरण जा, त्यांना साष्टांग प्रणिपात कर. त्यांची सेवा कर.

त्यांना जिज्ञासेने पुनःपुनः प्रश्न विचार तरच ते ज्ञान तुला देतील. अरे पोहरा जर विहिरीत बाकला नाही खाली तर त्यात पाणी भरेल का? तसेच ज्ञान मिळवायला नम्रता अत्यंत आवश्यक. 'विद्या विनयेन शोभते'.

आत्मज्ञानाने मोह शिल्लक उरणार नाही. साऱ्या समस्याची उत्तरे आपोआप तुझी तुलाच मिळतील. आत्मज्ञानाने सारी भूते तू आत्म्यात पाहशील व ते सारे परमात्म्यात पाहशील. विश्व विविधतेने नटलेले असले तरी त्यात एकच एक आत्मतत्त्व आहे. आत्मतत्त्वाच्या सूत्रात सारी सृष्टी ओवलेली आहे. हे विविधतेने नटलेले विश्व म्हणजेच भगवंता चं दृश्य रूप आहे. 'अनंत रुपे अनंत वेषे पाहिला म्या त्यासी' असे ज्ञानेश्वर सांगतात. ही विविधता वरवरची आहे. सर्व पदार्थातील मूलद्रव्य समान आहे हे आत्मज्ञान सांगते. 'भिन्न पदार्थातील विद्युत अणु (इलेक्ट्रॉन) एकच आहेत' हे सुद्धा विज्ञान सिद्ध करीत आहे. हे समान तत्त्व म्हणजे चैतन्य - आत्मा. गीता म्हणजे असे समान असणारे अनंत आत्मे एकाच विशाल परमतत्त्वात सामावलेले आहेत. ज्याप्रमाणे अग्नीत ठिणग्या, सूर्यातून सूर्य किरण बाहेर पडावेत तसे परमात्म्यतत्त्वात आत्मतत्त्व सामावलेले आहे. हे जाणणे यालाच ज्ञान म्हणतात. तो समाजाच्या दृष्टीने अनीतीमान असला तरी तो तरून जातो. अग्नी लाकडाला भस्म करतो तसे ज्ञानाग्नीत सारी कर्मे भस्म होतात. ज्ञान प्राप्तीने परमशांती लाभते. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।' ज्ञानासारखे पवित्र दुसरे काहीही नाही.

अज्ञानाने संशयग्रस्त होऊन फाटे फोडू नकोस, हे कसे शक्य आहे ? असे होऊच शकणार नाही वगैरे या संशयामुळे लोक परलोकीच काय इहलोकीही सुखी होत नाहीत. म्हणून आत्मानुभवी, ज्ञानी अशा लोकांवर श्रद्धा भक्ती ठेऊन स्वतःला घडव. त्यामुळे मोह रहित होशील. ज्ञान खड्गाने संशय दूर करून योगाचरण करून युद्धाला तयार हो. गीतेचा उपक्रम व उपसंहार अभ्यासल्यास मोह निराकारण हेच फलित निघते. गीतेचेच नाहीतर महाभारताचे सुद्धा हेच उद्दिष्ट असल्याचे व्यास 'महाभारतारंभी' सांगतात.

'यज्ञ' म्हणजे 'त्याग', 'अहम्'ला 'मी' ला विसरणे. आणि मी माझे ऐसी आठवण । विसरले जयाचे अंतःकरण । पार्था तोची संन्यासी जाण निरंतर ॥ भोगापेक्षा त्यागातला आनंद फार मोठा आहे.

स्वकर्म - स्वार्थासाठी केलेले सकाम कर्म.

स्वधर्म - निःस्वार्थीपणाने, कर्तव्यभावनेने केलेले कर्म.

स्वकर्मापेक्षा स्वधर्म श्रेष्ठ, व्यापक विश्वव्यापी सुखात आपले सुख पाहणे. विनोबाजी प्रवचनात एका अमेरिकन विदुषीचे जॉईस कॅरोल ओरस चे उदाहरण देतात. ती म्हणते ' Our body skin is not the boundry of our self. We extend it the whole society, humanity and the universe.' देहाची कातडी ही आपली अंतिम बाह्य रेषा नाही. ती आपण हा समाज, ही मानवजात, सामावून जाईल एवढी वाढवू शकतो. 'हे विश्वची माझे घर'.

दुसरे उदाहरण ते सांगतात रोटरी क्लबचे संस्थापक हॅरि यांचे 'स्वार्थापेक्षा सेवेला प्राधान्य द्या' हे त्यांचे ब्रीदवाक्य. आपला हरिही हेच सांगतो 'स्वार्थापेक्षा समाजहिताला, व्यक्तीपेक्षा समष्टीला प्राधान्य द्या.' आपला हरि काय व त्यांचा हॅरि काय तत्त्वज्ञान एकच.

ज्ञानरुपी खड्गाने संशयाचा नाश करून (जो अज्ञानातून निर्माण झाला) तू कर्मयोगाचे अवलंबन निष्कामपणे करून युद्धाला सज्ज हो. अशारीतीने हरींची कथा पुन्हा मूळ पदावर आली आहे.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्
'आराधना' टॉकिज जवळ, ठाणे (प), ४०० ६०२
फोनः ५४१०१४०

• • •

# भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा (आय. ए. एस.)
# देशातील सर्वोच्च सरकारी सेवेचा राजमार्ग !

आय. ए. एस. वरील हा लेख आमच्या कला वाणिज्य महाविद्यालयाच्या युवाशिल्प वरून मुद्दाम घेत आहोत. माहिती अधिक वाचकापर्यंत पोचावी हा हेतू आहे. - संपादक

आय. ए. एस. परीक्षा म्हणजे पूर्वाश्रमीची 'भारतीय सनदी सेवा' (आय. सी. एस) होय. स्वातंत्र्योत्तर कालखंडात तिचे 'भारतीय प्रशासकीय सेवा' असे नामकरण करण्यात आले. या परीक्षेतून एखादा उमेदवार काय होऊ शकतो त्याचे बानगीदाखल म्हणून ठाण्याचेच उदाहरण घेतले तर ठाणे महापालिकेचे आयुक्त के. पी. बक्षी हे आय. ए. एस. परीक्षेतून या पदावर पोहचलेले आहेत. तर ठाण्याचे पोलीस आयुक्त सुरेंद्र मोहन शंगारी हे याच परीक्षेद्वारा भारतीय पोलीस सेवेतून पोलीस आयुक्त पदावर पोहचलेले आहेत. ठाण्याचे जिल्हाधिकारी इकबाल सिंह चहल हेही याच परीक्षेतून आय. ए. एस. किंवा भारतीय प्रशासकीय सेवेद्वारा जिल्हाधिकारी पदावर पोहचलेले आहेत. जिल्हा परिषद मुख्याधिकारी, जिल्ह्याचे पोलीस प्रमुख, शहरात पोलीस उपायुक्त, मंत्रालयातील सचिव दर्जाचे अधिकारी इत्यादी सर्व या परीक्षेतून या विविध पदावर येतात. भारतीय प्रशासकीय सेवा (आय. ए. एस.) 'भारतीय विदेश सेवा' (आय. एफ. एस.) आणि पोलिस सेवा या तीन सेवांना अखिल भारतीय सेवा (ऑल इंडिया सर्व्हिसेस) असेही संबोधले जाते. यातूनच निवडलेल्या उमेदवारांची त्यांना मिळालेल्या गुणांनुसार भारतातील कोणत्याही राज्यात अथवा केंद्रशासित प्रदेशात नेमणूक होऊ शकते. अर्थात प्रत्येक उमेदवाराला नेमणुकीसाठी आपले स्वतःचे राज्य हवेच असते. पण ते त्याला या परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणांवर अवलंबून असते. जितके मिळालेले गुण जास्त तितकी त्या उमेदवाराला त्याच्या राज्यात नेमणूक मिळण्याची शक्यता जास्त. पण देशात या सेवांद्वारा कुठेही जाण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे.

हे आव्हान उत्तरेतील अथवा दक्षिणेतील विद्यार्थी स्वीकारताना दिसतात. पण मराठी विद्यार्थ्यांची महाराष्ट्र सोडून इतर राज्यात जाण्याची मानसिकता नसते. हे तेवढेच पळपुटेपणाचे व क्लेशकारक आहे. अर्थात काही अपवाद आहेतच. भारतीय विदेश सेवेद्वारा (आय. एफ. एस) जगातील कोणत्याही देशात भारताचे 'राजदूत' (अॅम्बॅसेडर) अथवा राष्ट्रकुल संघटनेच्या सदस्य राष्ट्रांमध्ये उदा. पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंडसारख्या देशात भारताचे 'उच्चायुक्त' (हाय कमिशनर) म्हणून काम करण्याची संधी मिळते. याच सेवेद्वारा भारताचे 'परराष्ट्र सचिव' पदासारख्या अतिशय महत्त्वाच्या पदावर जाता येते. भारतीय प्रशासकीय सेवेतून राज्यस्तरावर राज्याचे 'मुख्य सचिव' उदा. महाराष्ट्राचे मुख्य सचिव श्री. रंगनाथन किंवा देशपातळीवरील अतिशय महत्त्वाच्या पदावर केंद्रीय मंत्रीमंडळाचे सचिव या सर्वोच्च पदावर जाता येते. देशपातळीवर हे सर्वोच्च पद महाराष्ट्रातून श्री. भालचंद्र देशमुख यांनी भूषविले आहे. राज्य पातळीवर भारतीय पोलीस सेवेतून राज्याचे पोलीस महासंचालक पदापर्यंत (उदा. महाराष्ट्राचे पोलिस महासंचालक श्री. सुभाषचंद्र मल्होत्रा) पोहचता येते.

या व्यतिरिक्त भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षांमध्ये 'अ' वर्ग 'ब' वर्ग केंद्रीय सेवांचा (सेंट्रल

सर्व्हिसेसचा) समावेशही असतो. 'अ' वर्ग केंद्रीय सेवांमध्ये 'कस्टम्स अॅण्ड सेंट्रल एक्साईज 'इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिसेस', 'इंडियन पोस्टल सर्व्हिसेस', तर 'ब' वर्ग केंद्रीय सेवांमध्ये 'सेंट्रल सेक्रेटरीयट सर्व्हिस', 'कस्टम्स अप्रेझर्स सर्व्हिस' अथवा काही केंद्रशासित प्रदेशांच्या सिव्हिल सर्व्हिसेसचा समावेश असतो. 'भारतीय प्रशासकीय सेवा', 'भारतीय विदेश सेवा', 'भारतीय पोलीस सेवा', केंद्रीय 'अ' वर्ग व 'ब' वर्ग सेवा अशा एकूण २८ विविध सेवांसाठी एकच एकत्रित परीक्षा घेतली जाते. तीलाच 'भारतीय प्रशासकीय सेवा' (आय. ए. एस.) असे किंवा 'नागरी सेवा परीक्षा असेही म्हटले जाते. उमेदवाराला अंतिम परीक्षेत (लेखी परीक्षा+व्यक्तिमत्त्व चाचणी व मुलाखत यामध्ये) मिळालेल्या गुणवत्तेनुसार त्याला ती सेवा मिळते. दरवर्षी साधारपणे ९०० उमेदवार या परीक्षेच्या माध्यमातून निवडले जातात. त्यापैकी पहिल्या १५० उमेदवारांची भारतीय प्रशासकीय सेवेत, आय. ए. एस. (साधारणपणे ७० ते ७५ उमेदवार), भारतीय विदेश सेवा आय. एफ. एस. (साधारण ३० उमेदवार), भारतीय विदेश सेवा 'आय. एफ. एस' (साधारण ३० उमेदवार), व भारतीय पोलीस सेवेत 'आय. पी. एस' (साधारणपणे ५० उमेदवार) या तीन अखिल भारतीय सेवांमध्ये निवड होते.

सर्व यशस्वी उमेदवारांना मुलभूत प्रशिक्षण डेहराडून येथील 'लाल बहादूर शास्त्री' अकादमीत दिले जाते तर भारतीय पोलीस सेवेत प्रवेश मिळालेल्या उमेदवारांना हैद्राबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल पोलीस अकादमीत पुढील प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. प्रशिक्षण पूर्ण झालेल्या 'आय. ए. एस.' उमेदवारांना पहिली नियुक्ती साहाय्यक जिल्हाधिकारी किंवा प्रांत (एस. डी. ओ.) म्हणून दिली जाते. तर भारतीय पोलीस सेवेतील उमेदवारांची सहाय्यक पोलीस अधिक्षक किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी (एस. डी. पी. ओ.) या पदावरील नेमणूकीपासून सुरुवात होते.

भारत पारतंत्र्यात असताना इंग्रजांनी या सेवेची देशात सुरुवात केली. तिला त्यावेळी भारतीय सनदी सेवा (आय. सी. एस.) असे म्हटले जायचे. सुरुवातीला या सेवेत इंग्रजांना संधी होती व ती इंग्लंडमध्येच घेतली जात असे. परीक्षाही अतिशय कठीण होती. ग्रीक, लॅटीन सारख्या भाषांचाही अभ्यास करावा लागे. परंतु काही काळानंतर भारतीय तरुणांना ही सेवा खुली झाली. गुरुदेव रविंद्रनाथ ठाकुरांचे नाव सर्वांनाच माहित आहे. पण त्यांचे थोरले बंधु देवेंद्रनाथ ठाकू र हे पहिले भारतीय आय. सी. एस. (सनदी अधिकारी) होते हे फारच थोड्या लोकांना माहीत आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात पुढे नावारुपाला आलेल्या मोठमोठ्या नेत्यांनी ही परीक्षा उत्तीर्ण होऊन दाखवली आहे. त्यात सर्वांत वरचा क्रमांक लागतो नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा. अतिशय उच्च गुणांनी नेताजी ही परीक्षा यशस्वी झाले. पण परीक्षेच्या अंतिम टप्प्यात उमेदवाराला ब्रिटीश राजसत्तेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागे. एवढ्या एकाच कारणास्तव या थोर स्वातंत्र्यसेनानीने ही शपथ घेण्याचे नाकारुन आय. सी. एस. परीक्षेला लाथ मारली. हे भारताचे केवढे मोठे सुदैव! अन्यथा ब्रिटीश साम्राज्याला हादरवणारा हा महान नेता या देशाला लाभलाच नसता !

स्वातंत्र्यपूर्वकाळात डॉ. चिंतामणराव देशमुख हे या परीक्षेत संपूर्ण भारतात सर्वप्रथम आले. पुढे ते रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर झाले. तसेच स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री झाले. त्यांच्याच काळात भारतीय आयुर्विमा महामंडळची (एल. आय. सी.) भरभक्कम पायाभरणी झाली. योगायोगाने देशाचे विद्यमान अर्थमंत्री यशवंत सिन्हा हेही माजी आय. ए. एस. अधिकारी आहेत. तसेच छत्तीसगढ राज्याचे मुख्यमंत्री अजित जोगी हे सुद्धा माजी सनदी अधिकारी आहेत. हे सर्व इथे नमूद करण्याचे

कारण असे की, या परीक्षेतून केवळ सरकारी सेवेतील सर्वोच्च पदावर जाता येते असे नव्हे तर राष्ट्राच्या जडणघडणीच्या राष्ट्र उभारणीच्या अनेक महत्त्वाच्या संधी तुमच्यासमोर उभ्या राहतात हे विशेष.

ही परीक्षा देण्यास कोण पात्र आहे ? देशातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर या परीक्षेस पात्र ठरतो. पदवीसाठी ना फर्स्ट क्लासची गरज आहे ना हायर सेकंड क्लासची गरज ! पदवी परीक्षेत केवळ ४०% गुण मिळालेले उमेदवार अवघ्या दीड-दोन वर्षांच्या खडतर मेहनतीने आय. ए. एस. परीक्षा देऊन या सेवेतील उच्च पदावर पोहोचले आहेत. त्यातही विशेष म्हणजे आय. ए. एस. परीक्षेसाठी जो उमेदवार पदवी परीक्षेला बसला आहे, त्याची अंतिम परीक्षा व्हायची आहे व अद्याप निकाल लागायचा आहे, असा उमेदवारही या परीक्षेला पात्र ठरतो. अट मात्र एकच, तो त्या परीक्षेनंतर उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

वयोमर्यादा : या परीक्षेसाठी किमान वयोमर्यादा त्या वर्षीच्या १ ऑगस्ट रोजी २१ वर्ष पूर्ण इतकी आवश्यक आहे. तर जास्तीत जास्त वयोमर्यादा ३० इतकी आहे. अर्थात अनुसूचित जाती-जमातींसाठी वयोमर्यादेत ५ वर्षांची सवलत (कमाल ३५ वर्ष) आहे तर इतर मागासवर्गीयांसाठी ३ वर्षांची (कमाल ३३) सवलत आहे. अशाच प्रकारची सवलत अंध, अपंग, माजी सैनिक इत्यादी गटातील उमेदवारांना लागू आहे.

या परीक्षेसाठी किती प्रयत्न करता येतील ? सर्वसाधारण उमेदवाराला ४ वेळा ही परीक्षा देता येते. इतर मागासवर्गीयांना ७ वेळा परीक्षा देता येते व अनुसूचित जाती-जमातींना हे बंधन लागू नाही. परीक्षेच्या कोणत्याही स्तरावरील प्रयत्न उदा. पूर्व परीक्षा, लेखी परीक्षा, मुलाखत चाचणीचा प्रयत्न हा प्रत्येक स्तरावरील एक प्रयत्न मानला जातो हे मुद्दाम लक्षात ठेवले पाहिजे.

परीक्षेसाठी शुल्क : सर्वसाधारण उमेदवार आणि इतर मागासवर्गीयांसाठी परीक्षेला शुल्क ५० रुपये (सेंट्रल रिक्रुटमेंट फी स्टॅम्प) आहे तर अनुसुचित जाती-जमातींसाठी तसेच अपंगांना कोणतेही परीक्षा शुल्क भरावे लागत नाही. तर मुख्य परीक्षा (लेखी) साठी १०० रुपये (फक्त सर्वसाधारण व इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी) इतके परीक्षा शुल्क आहे.

अर्ज/माहितीपत्रक/अभ्यासक्रम कसा उपलब्ध होईल ? ही परीक्षा अतिशय नियोजनबद्ध आय. ए. एस.रीतीने आयोजित केली जाते. जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार दरवर्षी डिसेंबरच्या तिसऱ्या शनिवारी एम्प्लॉयमेंट न्यूज/रोजगार समाचार (सिव्हिल सर्व्हिसेसची विशेष पुरवणी) मध्ये परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध होते. त्यात या परीक्षेची संपूर्ण माहिती, अभ्यासक्रम, परीक्षेचे स्वरुप व पद्धती, विषयांची यादी, परीक्षा केंद्रे तसेच अर्ज मिळण्याची ठिकाणे इत्यादी परिपूर्ण माहिती दिलेली असते. विशेष म्हणजे या परिक्षेसाठी अर्ज पूर्वी एम्प्लॉयमेंट न्यूजच्या अंकातच उपलब्ध असायचा, आता मात्र हा अर्ज आयोगाने दिलेल्या यादीतील पोस्ट ऑफिसेसमध्येच उपलब्ध असतात. अर्जाची किंमत २० रुपये असते. महाराष्ट्रात जिल्ह्याच्या सर्व मुख्यालयातील पोस्ट ऑफिसमध्ये हे अर्ज उपलब्ध आहे. मुंबई-ठाण्यासाठी मुंबई मुख्य पोस्ट-ऑफीस (व्ही. टी. जवळ), अंधेरी, बोरीवली, चेंबूर, चिंचबंदर, गिरगांव, काळबादेवी, माहीम, मांडवी, मुंबई सेंट्रल, ठाणे येथील मुख्य पोस्ट ऑफीस/ अथवा पोस्ट ऑफीसमध्ये उपलब्ध आहेत. या परीक्षेसाठी अर्ज हा आयोगाने उपलब्ध करुन दिलेल्या छापील नमुन्यातच करावा लागतो, कोणताही इतर अर्ज अथवा झेरॉक्स प्रत चालत नाही, अन्यथा अर्ज फेटाळला जातो, याची नोंद घेणे आवश्यक आहे.

परीक्षेसाठी अर्ज/माहितीपत्रक उपलब्ध होत

नसल्यास केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या 'FORMS SUPPLY MONITORING CELL' या विभागाशी 011 (STD CODE) 3389366 OR Fax No. 011-3387310 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. त्याचप्रमाणे ज्यांच्याकडे इंटरनेट सुविधा आहे अशा उमेदवारांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या संकेत स्थळावर (website)"http://www.upsc.gov.in" या पत्त्यावर सर्व माहिती उपलब्ध होईल.

अर्ज हा आयोगाने नेमून दिलेल्या पोस्ट ऑफीसमधूनच मिळवावा लागतो व परीक्षेची विविध केंद्रे (पूर्व व लेखी परीक्षा) त्यांची नावे व संकेत क्रमांक (कोड नं.) तसेच पूर्व व लेखी परीक्षेचा संकेतांक (कोड नं.) हे फक्त एम्प्लॉयमेंट न्यूजच्याच अंकात उपलब्ध आहेत. त्यामुळे परीक्षेच्या अर्जासोबत एम्प्लॉयमेंट न्युज/रोजगार समाचारचा या परीक्षेच्या जाहीरातीचा अंक (सिव्हील सर्व्हिसेस परीक्षा विशेष पुरवणीसह) मिळवणे उमेदवाराला अपरिहार्य ठरते. हा अंक रेल्वे स्थानकावर वृत्तपत्र विक्रेत्याकडे ५ रुपयाला उपलब्ध असतो. किंवा Editor, Employment News, East Block-IV, Level-5, R.K. Puram, New Delhi - 110 066 (Tel. 619 3316) या पत्त्यावरून पोस्टाने मागविता येईल.

या परीक्षेचा अर्ज भरताना काळजी घेतली पाहिजे. उदा. क्रमांक १) मध्ये 'Examination for which applying' असे म्हटलेले आहे. तेथे 'CSP' पर्यायासमोर खूण करणे आवश्यक आहे. (CSP म्हणजे Civil Service Preliminary Examination). (११) क्रमांकाच्या कॉलममध्ये सीएसपी असे म्हटलेले आहे, तेथे वैकल्पिक विषयाचा संकेतांक लिहायचा आहे. उदा. तुम्ही निवडलेला विषय 'इंडियन हिस्ट्री' असेल, त्याचा संकेतांक (१०) असा आहे. त्याचप्रमाणव आपण निवडलेल्या केंद्राचा संकेतांकही उदा. मुंबई (बॉम्बे) '०५' असा संकेतांक कॉलम नंबर १४ मध्ये भरणे आवश्यक आहे.

अर्ज भरताना अतिशय काळजीपूर्वक दिलेल्या सूचनांनुसार भरणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज बाद होऊ शकतो. परीक्षा केंद्राचा संकेतांक, विषयाचा संकेतांक, यापूर्वी परीक्षेला केलेले प्रयत्न, स्वतःचे नाव, परीक्षा शुल्क (सेंट्रल रिक्रुटमेंट फी स्टॅम्प, रद्द केलेला), छायाचित्र, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, हा सर्व तपशील काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे. किंवहुना यापैकी कोणताही एक तपशील भरावयाचा राहिल्यास अथवा उमेदवार स्वतःची सही करण्यासही विसरला तर अर्ज बाद ठरतो.

अर्ज पाठविण्याचा पत्ता : परीक्षेसाठी अर्ज Secretary, Union Public Service Commission, Dholpur House, New Delhi-110011 या पत्त्यावर पाठवणे आवश्यक आहे.

आयोगाला अर्ज पाठविण्यापूर्वी हे तपासा :

१) आपण पाठवलेला अर्ज हा पोस्टामधून घेतलेला असावा.

२) अर्जात तपशील भरण्यासाठी, लागू असलेली वर्तुळे काळी करण्यासाठी 'डार्क एचबी' पेन्सिलचाच वापर करावा.

३) कॉलम २४ मध्ये उमेदवारीची सही काळ्या किंवा निळ्या शाईच्या बॉलपेनने केलेली असावी.

४) उमेदवाराचे अगदी अलिकडचे शक्यतो कृष्ण-धवल 'Black & White', 4 cm x 5 cm आकाराचे छायाचित्र सांगितलेल्या जागेत चिकटवावे, त्यावर उमेदवारीची सही नसावी तसेच ते प्रमाणित (अटेस्टेड) नसावे.

५) परीक्षा शुल्क म्हणून ५० रुपयांचा एकच 'सेंट्रल' रिक्रुटमेंट फी स्टॅम्प (जो पोस्ट ऑफीसने रद्द केलेला आहे), दिलेल्या जागेवर चिकटवयाचा आहे. पोचपावती

(अँकनॉलेजमेंट कार्ड) अर्जाच्या लिफाफ्यात पाठवली आहे.

६) ज्या लिफाफ्यात अर्ज पाठवला आहे, त्या लिफाफ्यावर 'सिव्हिल सर्व्हिसेस (प्रिलिमिनरी) एक्झामिनेशन' असे ठळक अक्षरात लिहिणे आवश्य आहे.

अधिक तपशिलासाठी व माहितीसाठी 'एम्पल्यॉयमेंट न्यूज' ची सिव्हिल सर्व्हिसेसची विशेष पुरवणी पहावी व त्यातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

या परीक्षांविषयी मार्गदर्शन करणाऱ्या दोन संस्थांची नांवे विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी देत आहे.

१) डॉ. प्रभा गणोरकर, राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, (बोरीबंदर) मुंबई - ४०० ०११, दूरध्वनी : २०७०९४२/२०६१०७१

२) आ. श्रीकृष्ण गोखले, संचालक, डॉ. चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, जुने ठाणे महानगरपालिका कार्यालय, सुभाष पथ, (जवाहर बागेजवळ) ठाणे (प)- ४०० ६०१, दूरध्वनी (५३३६२११).

(विशेष सुचना : या परीक्षेच्या स्वरुप पद्धतीविषयी संपूर्ण माहिती एका तक्त्याच्या स्वरुपात पुढील पानावर दिली आहे, ती काळजीपूर्वक वाचावी.)

प्रा. अनिल भापड

मराठी विभाग,

जोशी कला व बेडेकर वाणिज्य महाविद्यालय,

ठाणे - ४०० ६०१.

•••

प्रा. अनिल भापड यांचा नागरी सेवा परीक्षांचा अभ्यास व व्यासंग मोठा आहे. त्यांना स्वत:ला प्रशासकिय कामांचा विपुल अनुभव आहे. ठाणे महानगर पालिकेत ते जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करीत होते. विद्यार्थ्यांना या विषयीचे मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने त्यांनी बरेच लोखन केले आहे.

दिशाच्या इच्छुक वाचकांनी प्रा. भापड यांना या संदर्भात भेटण्यास हरकत नाही.

# दृष्टीक्षेपात भारतीय
# (इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह

| १) नागरी सेवा परीक्षेचे स्तर आणि टप्पे | २) परीक्षेचे स्वरुप | ३) प्रश्नपत्रिका |
|---|---|---|
| १) प्रथम स्तर<br>अ) नागरी सेवा प्रारंभिक (पूर्व) परीक्षा : सामान्य अध्ययनाच्या अनिवार्य विषयासह एकूण २२ विषयांपैकी कोणताही एक वैकल्पिक विषय निवडावा लागतो. देशातील ४४० केंद्रावर ही परीक्षा घेतली जाते. (दरवर्षी मेच्या पहिल्या किंवा दुसऱ्या रविवारी घेतली जाते. | पूर्व परीक्षा चाळणी परीक्षा असून वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची, योग्य पर्यायावर पेन्सिलीने केवळ खूणा कराव्या लागतात. वैकल्पिक विषयाचा अभ्यासक्रम पदवी पातळीचा असतो. | पेपर - १ सामान्य अध्ययन (अनिवार्य)<br>पेपर - २ बावीस वैकल्पिक विषयांपैकी कोणताही एक विषय निवडावा. |
| २) द्वितीय स्तर (नागरी सेवा मुख्य परीक्षा)<br>ब) लेखी परीक्षा : भाषा विषय, इंग्रजी, निबंध, सामान्य अध्ययन या अनिवार्य विषयांसह एकूण २५ वैकल्पिक विषयांपैकी दोन विषयांची निवड करावी लागते. (भाषा साहित्य विषयांसह एकूण ४८ वैकल्पिक विषय), देशभरातील लेखी परीक्षेच्या ३५ केंद्रावर मुख्य परीक्षा (लेखी) दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान (नोव्हेंबरच्या पहिल्या शुक्रवार पासून घेतली जाते. | मुख्य परीक्षा पारंपारिक स्वरुपाची आणि निबंधात्मक स्वरुपाची परीक्षा असते.<br>पेपर क्रमांक १ व २ या भाषा विषयांचा दर्जा हा शालांत परीक्षेच्या समकक्ष असतो. लेखी परीक्षेत योग्य आणि प्रभावी अभिव्यक्ती सोबत शब्दमर्यादेला गुण दिले जातात. या घटकांबरोबरच वेळेचे भान हा घटकही निर्णायक ठरतो. अभ्यासक्रम पदवी पातळीचा असतो. | पेपर- १ भारतीय घटनेच्या ८ व्या परिशिष्टातील कोणत्याही एका भारतीय भाषा विषयाची प्रश्नपत्रिका (अनिवार्य) उदा. मराठी<br>पेपर - २ इंग्रजी भाषा विषय (अनिवार्य)<br>पेपर - ३ निबंध पेपर (अनिवार्य)<br>पेपर - ४ व ५ सामान्य अध्ययन (अनिवार्य)<br>पेपर - ६ व ७ वैकल्पिक विषय क्रमांक - १<br>पेपर - ८ व ९ वैकल्पिक विषय क्रमांक - २ |
| ३) द्वितीय स्तर - (नागरी सेवा मुख्य परीक्षा)<br>क) मुलाखत व व्यक्तिमत्व चाचणी परीक्षा दरवर्षी लेखी परीक्षेचा निकाल मार्चमध्ये लागून मुलाखत दिल्ली येथे एप्रिल-मे दरम्यान घेतात व अंतिम निकाल मेच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करतात. | मुलाखत व व्यक्तिमत्व चाचणीचे स्वरुप :<br>मुलाखत मंडळाच्या समोर ही चाचणी घेतली जाते. उमेदवाराच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाबरोबरच त्याची मानसिक कुवत, सामान्य अभिरुची, चालू घडामोडींचे ज्ञान, आकलन क्षमता, कुशलता आणि समाजमूल्यांचे मूल्यमापन केले जाते. | |

# नागरी सेवा परीक्षा
# सर्व्हिसेस एक्सामिनेशन, आय. ए. एस.)

| ४) परीक्षा माध्यम | ५) एकूण प्रश्न आणि गुण | ६) वेळ | ७) इतर माहिती |
|---|---|---|---|
| प्रश्नपत्रिका इंग्रजी व हिंदी भाषेत छापलेल्या असतात. योग्य उत्तरावर केवळ खुणा करावयाच्या असल्याने माध्यमाचा प्रश्न नाही. | १) १२०-१५० प्रश्नासाठी १५० गुण, प्रत्येक प्रश्नाला १ गुण.<br>२) १२०-१५० प्रश्नासाठी ३०० गुण, प्रत्येक प्रश्नाला अडीच गुण.<br>एकूण गुण = १५०+३०० = ४५० | दोन तास<br>दोन तास | एकूण गुण = १५०+३०० = ४५० गुण. साधारणपणे ४५० गुणांपैकी उमेदवाराला ३००-३५० दरम्यान गुण मिळाल्यास तो मुख्य परीक्षेस पात्र ठरतो. चाळणी परीक्षा असल्याने मिळालेले गुण जाहीर केले जात नाहीत व अंतिम गुणवत्ता यादीसाठी विचारात घेतले जात नाहीत. |
| प्रश्नपत्रिका त्या त्या भाषेत छापलेल्या असतात आणि त्या त्या भाषेत उत्तर लिहावयाची असतात.<br>इंग्रजी माध्यम | १) ३०० गुण<br>२) ३०० गुण | तीन तास<br>तीन तास | या दोन भाषाविषयांत किमान गुण (उदा. ४०%) मिळणे अत्यावश्यक अन्यथा उमेदवार अपात्र ठरून त्याचे इतर विषयांचे (पेपर क्रमांक ३ ते ९) पेपर तपासले जात नाहीत. त्याचबरोबर भाषाविषयांचे गुण एकूण परीक्षेत धरले जात नाही. |
| परीक्षेसाठी निवडलेल्या माध्यमात उत्तरे लिहावयाची असतात. (उदा. मराठी) प्रश्नपत्रिका ४ ते ९ या हिंदी व इंग्रजी माध्यमात छापलेल्या असतात. त्यांची उत्तरे परीक्षेसाठी निवडलेल्या माध्यमात लिहावयाची असतात.<br>(भाषा विषय अपवाद आहे)<br>लेखी परीक्षा (पेपर क्रमांक ३ ते ९) एकूण गुण = २००० गुण | ३) २०० गुण<br>४) ३०० गुण<br>५) ३०० गुण<br>६) ३०० गुण<br>७) ३०० गुण<br>८) ३०० गुण<br>९) ३०० गुण | प्रत्येकी तीन तास (पेपर क्रमांक३ ते ९) लेखी परीक्षा एकूण गुण (पेपर क्रमांक ३ ते ९ =२००० गुण<br>ब) मुख्य परीक्षा २००० गुण | पेपर्स क्रमांक ३ ते ९ यांचे गुण मुख्य परीक्षेसाठी विचारात घेतले जातात. भाषा विषय आणि साहित्य विषय वगळता सर्व प्रश्नपत्रिका या इंग्रजी व हिंदी माध्यमात छापलेल्या असतात. उत्तरे लिहिताना पे. क्र. ३ ते ९ पर्यंत एकच माध्यम कायम ठेवावे लागते. त्याच बरोबर या पेपरात तांत्रिक शब्दांसाठी परीक्षा माध्यमाबरोबरच कंसात इंग्रजी पर्यायी शब्द योजनेस आयोगाने मुभा दिली आहे. साधारणपणे लेखी परीक्षेत ४५ टक्के गुण मिळाल्यास मुलाखतीस पात्र. मुख्य परीक्षेस (ब+क) २३०० गुणांपैकी ५५ टक्के दरम्यान गुण मिळाल्यास भारतीय प्रशासन सेवेत प्रवेश निश्चित. अंतिम गुणवत्ता यादी २३०० गुणांपैकी मिळालेल्या गुणांवरून ठरते. |
| इंग्रजी अथवा परीक्षा माध्यमातून (उदा. मराठी) मुलाखत देता येते. मुख्य परीक्षा एकूण गुण (लेखी परीक्षा, मुलाखत व्यक्तिमत्त्व चाचणी) (ब+क) | १०) ३०० गुण<br>(ब + क) = २३०० गुण | क) एकूण गुण (ब+क)<br>२००० + ३०० = २३०० गुण. | |

# स्वामी विवेकानन्द

४ जुलै २००२ रोजी स्वामी विवेकानंदांच्या समाधीस १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने त्यांचे हे विनम्र अभिवादन. - संपादक

**श्रध्दांजली :**

४ जुलै २००२ रोजी स्वामी विवेकानंद यांच्या निर्वाणाला एक शतक पूर्ण होत आहे. स्वामीजींची धगधगती चिता पाहण्याचे दुर्भाग्य त्यांची माता भुवनेश्वरी देवी यांच्या नशीबी होते. हा दैव दुर्विलास होय. स्वामीजींचे कार्य आजही आपल्या समोर आहे. भारताच्या वैचारिक भव्यतेचे अखिल विश्वाला दर्शन घडवून आणणारे एक संन्यासी म्हणूनच ते आज आपल्या समोर उभे आहेत. त्यांच्या या धर्म कार्यात, राष्ट्र घडणीच्या कार्यात सहभागी होण्यानेच आम्ही त्यांचे ऋण खऱ्या अर्थाने मान्य करीत आहोत हे अभिव्यक्त होईल. एकटे विवेकानंद, एकटे शंकराचार्य, एकटे आर्य चाणक्य हेच या देशाचे वैभव पुनरपि प्राप्त करून देऊ शकतात ही या देशातील संन्यस्त वृत्तीच्या लोकांची परंपरा आहे. संन्यस्त वृत्तीच देशाच्या वैभवाला उजाळा देणारी आहे याचा विसर आम्हा भारतीयांना कधीही पडता कामा नये. भारतीय सांस्कृतिक जीवन परंपरेतील ही उत्तुंग व्यक्तिमत्वे होत. यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन ईश्वरनिष्ठा व देशनिष्ठा आंगी बाणवणे हीच या महापुरुषांना खरी श्रध्दांजली होय.

**स्वामीजींचे व्यक्तिमत्त्व :** स्वामीजींचा जन्म सोमवार दि. १२ जानेवारी १८६३, पौष शु. ७ शके १७८४ या दिवशी झाला. त्या दिवशी मकर संक्रात होती. उगवत्या सूर्याच्या साक्षीने स्वामीजी भूलोकी अवतरले. एक तेजस्वी पुरुष जन्माला येत असल्याची जणू ग्वाहीच उगवत्या सूर्याने ध्वनित केली. या नर श्रेष्ठाचे आध्यात्मिक जीवन, परिव्रज्या, अभूतपूर्व पवित्र्य चारित्र्य, प्रगाढ पांडित्य, अतुलनीय वक्तृत्व, प्रखर स्वदेश प्रेम, हीन दीनासाठी त्यांना वाटणारी अनुकंपा आदी अनुपम होती. तसेच ज्ञान, वैराग्य, तेजस्विता आणि वीरता आदी गोष्टींनी युक्त त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. भारताच्या राष्ट्रीयतेचे त्यांनी केलेले जागरण, जगाच्या कल्याणासाठी त्यांनी केलेला आत्मोत्सर्ग, प्राच्य व पाश्चात्य दर्शन शास्त्रात त्यांनी टाकलेली अमोलिक भर या सर्व गोष्टी मुळे मानव समूहावर अप्रतिहत प्रभाव प्रस्थापित करणाऱ्या स्वामीजींच्या गौरवाची गाथा त्यांच्या निर्वाणाच्या शतक वर्ष निमित्ताने मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

**स्वामीजी कोण होते :** स्वामीजी संबंधी कुणाच्या काही समजुती असोत, ते स्वामीजींना प्रति शंकराचार्य समजोत, प्रखर देशभक्त समजोत, एक द्रष्टा पुरुष समजोत वा संन्यासी योद्धा समजोत, त्या बद्दल विशेषता काहीच नाही, मात्र स्वामीजींनी निर्दिष्ट केलेले मार्ग आणि सूचित केलेले उपाय अंगीकृत वा ग्रहण जो जो मनुष्य करील त्या प्रत्येकाला अखिल मानव जातीच्या उन्नती करता आणि त्यांच्या नैतिक व तात्त्विक कल्याणाकरता स्वामीजींच्या रूपाने एक प्रचंड शक्ती या भूतलावर अवतीर्ण झाली होती हे कबूल करावे लागेल. निदान एवढ्या करता तरी स्वामीजींचे चरित्र लक्षपूर्वक वाचून त्याचे सूक्ष्म दृष्ट्या मनन करणे हे उचित ठरेल.

स्वामीजींचा जीवन पट हा एक उच्च कल्पनांचा, आध्यात्मिक प्रेरणांचा आणि संन्यासाच्या वैभवाचा इतिहास आहे. मानवी स्वभावाची सर्व श्रेष्ठता आणि आकांक्षा यांची चित्रे रेखाटलेला एखादा गुंडाळलेला पट हळू हळू उलगडू लागला असता जसा देखावा दिसतो तसाच देखावा स्वामीजींच्या चरित्रात दिसून येतो.

**श्रीरामकृष्ण व विवेकानंद :** श्री रामकृष्ण परमहंसांची भेट होण्या पूर्वीपासूनच नरेंद्राच्या ठिकाणी सत्यान्वेषण बुद्धी जागृत झालेली होती. आर्यांच्या धर्म विषयक कल्पना आणि आचार विचार यांचे पृथक्करण करुन त्याना तर्कशास्त्राच्या कसोटीवर घालून त्याची सत्यता पारखण्याची त्यांची प्रकृती होती. परमहंसांचे दर्शन झाल्या दिवसापासून हा मनु पालटला. आणि स्वामी विवेकानंद या नावाने पुढील काळात प्रसिद्धीस आलेली मूर्ती घडवण्यास प्रारंभ झाला. परमहंस हे अर्वाचीन हिंदु धर्माचे जीवतत्व होते. श्री रामकृष्ण हे ज्ञानी होते. आणि स्वामी विवेकानंद ते ज्ञान जनतेला समजावून सांगणारे धर्माचार्य होत. एकाचे चरित्र दुसऱ्याच्या चरित्रावाचून अपुरे राहिले असते. म्हणूनच असे म्हटले जाते की एकाचे चरित्र हे दुसऱ्या चरित्राचे आविष्करण, स्पष्टीकरण होय.

विवेकानंदांच्या देहाचा आश्रय करुन जणू काही स्वतः भगवान श्री रामकृष्णच आसेतु हिमाचल सनातन धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संचार करीत होते. स्वामीजींच्या ठिकाणचे अद्भुत सामर्थ्य परमहंसांच्या शिकवणीमुळे आविष्कृत झाले आणि त्यांनीच स्वामीजींना भावी कार्याची दिशा आखून दिली. आपल्या देशाची हीनदीन स्थिती पाहून स्वामीजींनी अश्रू ढाळले, ही स्थिती सुधारण्यासाठी परमेश्वराची करुणा भाकली. आपल्या मातृभूमीत परमेश्वराच्या कृपेने लौकरच वैभव सूर्याचा उदय होईल अशी अंतःकरणात आशा उत्पन्न होऊन त्यांचे चित्त पुनःप्रसन्न होई. संयोजनाची आणि पुनरुज्जीवनाची शक्ती आपल्या राष्ट्रात स्वयंभू आहे हे पाहून त्यांना आनंदाचे भरते येई आणि त्यांचे अंतःकरण उत्साहाने भरुन जाई. त्यांच्या सर्व तपश्चर्येत भारत मातेचे वैभव हे ध्येय डोळ्यासमोर सतत होते.

**अमेरिका गमन :** स्वामीजी असे एक व्यक्तिमत्व होते की ज्यांनी पूर्व आणि पश्चिम यातील दुवा सांधला. हा दुवा एक असाधारण स्वरूपाचा ठरला. कारण तो या देशाच्या आध्यात्मिक प्रेरणेतून घडून आलेला होता आणि म्हणूनच एक संधता, एकात्मता आणि मानवता या त्रिवेणी संगमात त्या दुव्याचे रुपांतर झाले. याच महापुरुषाने हजारो वर्षे इतर देशापासनू आलिप्त असलेल्या हिंदुस्थान देशाला प्रथमच आंतरराष्ट्रीय स्तरावर नेऊन उभे केले. आणि हे एक फार मोठे चिरस्मरणीय कार्य आहे. स्वामीजी म्हणत असत, आपण स्वतः भोवती एक प्रकारची समजुतीची भिंत उभी केली आणि त्यामुळे विचारांची देवघेव पूर्णपणे थांबली. आपले विचार बाहेर जाणार नाहीत, बाहेरचे आपणापर्यंत पोहोचणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण केली ही फार मोठी चूक झाली, ही गोष्टच आपल्या अवनतीचे खरे कारण आहे. अशा पद्धतीने वागून आपण आपल्या सामाजिक जीवनाचे डबके केले. परिणाम आमचे जीवन कुजले, सडले आणि आपण हजारो वर्षे या अवस्थेत राहिलो, याला फाटा देण्यासाठी स्वामीजींनी परदेशी गमनाचे धाडस केले.

या बाबत स्वामीजी पुढे म्हणतात - देणे व घेणे हा व्यावहारिक नियम आहे. जर हिंदुस्थानला वर उठवायचे असेल तर त्याच्याकडे जे श्रेष्ठ धन आहे, ते भांडार सर्वांसाठी उघडे केले पाहिजे. आणि मोबदल्यात जे काही चांगले आहे, जरी ते अर्वाचीन असले तरी स्वीकारले पाहिजे. विकास हेच जीवन, संकुचितपणा हाच मृत्यू. हाच हेतू मनात बाळगून आपले श्रेष्ठ असे आध्यात्मिक धन दिगंतात देण्यासाठी स्वामीजी परदेशात गेले. हाच त्यांचा द्रष्टेपणा. विवेकानंद हे अमेरिकेला गेलेले भारताचे पहिले राजदूत होत. त्यांनी हिंदुस्थानची बाजू चोख मांडली. हिंदुस्थान व तेथील जनतेबद्दल असलेला परकीयांचा गैरसमज नाहीसा केला आणि हिंदुस्थान कडे पाहण्याची दृष्टी साफ बदलून टाकली. हे त्यांचे विशेष कार्य होय.

**रामकृष्ण मिशनची स्थापना :** मानव निर्मित कार्य अव्याहत चालावे त्यात खंड पडू नये, कार्य कर्त्यांची वाण राहू नये हा दूरवर विचार करुन रामकृष्ण यांच्या नावे

संन्यासी लोकांची संघटना उभी केली. सेवा आणि ज्ञानदान ही त्यांची प्रमुख उद्दिष्टे ठरविली. आपण संन्यस्त वृत्तीने राहून जनतेला परमात्म्याच्या भूमिकेत पहात त्यांची सेवा करणे ही श्रेष्ठ प्रकारची ईश सेवा होय. हे ध्येय या मिशन स्थापनेच्या मागे होते. या मिशनची स्थापना १८९८ साली झाली. आज तागायत रामकृष्ण मिशन देशात व देशांतर्गत भूभागावर सेवारत आहे.

**विवेकानंद व श्रीमत् शंकराचार्य** : श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी तत्कालीन परिस्थिती अनुसरुन वेदान्त व तत्त्वज्ञान यांची तर्कशुद्ध मांडणी केली. त्याचप्रमाणे १९व्या शतकाच्या शेवटच्या दशकात व २०व्या शतकाच्या उषःकाली विवेकानंदांनी तत्त्वज्ञानाची नवी मांडणी केली. वेदान्त व्यवहारात आचरण्यासारखा आहे, आणि अशा प्रकारच्या आचरणाने लोकांच्या नैतिक भावना व उच्च मनोवृत्ती विकास पावून त्यांचा आयुष्यक्रम अधिक उज्वल होतो हे पटवून दिले. त्यांचा उपदेश आत्मानुभवाच्या पायावर उभारलेला होता. त्यांच्या मुखावर नित्य "चिदानंदरुपः शिवोऽहम्" अगर अद्वैत भावनेचे तेज विलसत असे. "शिवोभूत्वा शिवेयजेत्" या तत्त्वांचाच ते उपदेश करीत. स्वामीजी हे कट्टर ईश्वरभक्त होते. ते सत्याचे निःसीम पुरस्कर्ते होते. त्यांचे प्रेम विश्वव्यापी बनले होते. भारता प्रमाणे सर्व जग त्याना आपलेसे वाटे. हिंदुस्थानात कर्म योगाचा-तेजस्वी व्यावहारिक वेदान्ताचा-उपदेश त्यांनी केला. सर्व जगावर वेदान्ताची छाप पाडणे व बहुजन समाजाची सर्व प्रकारे उन्नती करणे हेच भारताच्या पुनरुज्जीवनाचे दोन पर्याय आहेत अस त्यांनी समजावून दिले.

**कार्याचा आढावा** : आपल्या देश बांधवांची निर्हेतुक आणि निरहंकार भावनेने केली जाणारी सेवा ही प्रत्यक्ष भगवंताचीच सेवा होय. अशा तऱ्हेची नवी राष्ट्रीय दृष्टी आणि लोक सेवेची नवीन प्रवृत्ती व्यावहारिक वेदान्ताच्या स्वरूपात त्यांनी जनतेमध्ये निर्माण केली. रामकृष्ण मिशनची स्थापना, परदेशागमन, या भूमिकेतूनच घडलेली आहेत. ज्ञान भक्ती कर्म आणि योग ही धर्माची चारही अंगे सामर्थ्य निर्माण करणारी आहेत. या पैकी मानवाने कोणत्याही अंगाच्या माध्यमातून स्वतःतील शिवत्व प्रगट करावे असे ते म्हणत.

**महानिर्वाण** : ४ जुलै २००२ साली स्वामीजींची जीवन ज्योत महाज्योतीत विलीन झाली. ते अवघे ३९ वर्षांचे होते. सार्वजनिक आयुष्याला सुरुवात स्वामीजींनी १८९३ साली म्हणजे वयाच्या ३०व्या वर्षी केली. केवळ ९ वर्षे त्यांनी सार्वजनिक कार्य केले. पैकी ५ वर्षे परदेशात, अखेरची २ वर्षे आजारपणात गेली. केवळ २/३ वर्षेच हिंदुस्थानाच्या वाट्यास आली. परदेशात स्वामीजींनी केवढे अलौकिक कार्य केले आहे हे ध्यानात येईल. चिर स्वरूपाची संन्याशांची संघटना उभी केली, त्या द्वारे मानव सेवा व ज्ञानदान या गोष्टी अव्याहत चालू ठेवील्या. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात हिंदुधर्म व तत्त्वज्ञान यांचा ठोस परिचय करून दिला. असा हा भारताचा थोर सुपुत्र आव्यहत कार्य करून सर्व जगाला दिपवून स्वस्थानी गेला.

**चरित्र माहात्म्य** : ज्या महात्म्याने पूर्वेच्या अंतःकरणाला चटका लावला आणि त्यात आत्मश्रद्धेचा तुफानी प्रवाह उत्पन्न केला व पश्चिमेच्या मनाला हालवून सोडून त्याला अध्यात्म प्रवण केले. त्या महात्म्याच्या चरित्राची आपल्याला ओळख असेण अगत्याचे आहे.

**शं. वा. मठ**

६, कुमार अशिष,
राम मारुती रोड, ठाणे - २.

•••

# हॅनॉईः राखेतून निर्माण झालेले शिल्प

भारताच्या पूर्वेस आशिया खंडातच चीन व लागोसच्या सीमेस लागूनच असलेले व्हिएतनाम हे छोटे राष्ट्र व त्याची तेवढीच छोटी राजधानी म्हणजे हॅनोई. आयवॅग (IVACG) या जागतिक आरोग्य संघटना (WHO) व UNICEF यांच्या सहकार्याने काम करणाऱ्या संस्थेचे जेव्हा मला 'ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासींच्या मुलांमधील कुपोषण' या संदर्भातील चार्चसत्रासाठी आमंत्रण आले तेव्हा मी हरखून गेलो. कारण या महत्वाच्या चर्चासत्रा बरोबरच मला गेले कित्येक वर्षे माझ्या मनात साकारलेले हॅनोईचे शिल्प प्रत्यक्षात पहावयास मिळणार म्हणून. हो ! कित्येक वर्षे लोटली तरी आपले जपानी कौतुक अजूनही चालूच आहे.म्हणे दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेले राष्ट्र परत जिद्दीने पुन्हा उभा राहिले.... पण खोडी कोणी काढली होती तुम्हीच ना ! येथे मात्र कसलीही कागाळी नसताना ही एका महासत्तेकडून तुमची राखरांगोळी होते. सर्व त्या महासत्तेच्या पराक्रमाचे साक्षीदार पहात होते .... सुसाट वारा येईल अन् ही राख वाहून जाईल पण झाले उलटेच. राखेखाली दबलेल्या प्रेतांनी, त्यातली असंख्य बालकांनी त्यांच्या गोऱ्या गोऱ्या चिमुकल्या हातात ती राख दाबून ठेवली अन् २००० शतकाच्या शेवटच्या पाव हिश्यात हॅनोईचे सुंदर शिल्प उभे केले.

१२ फेब्रुवारीस हॅनोईत पोहोचल्यावर मी पहिले काम केले ते म्हणजे १०० डॉलरचे व्हिएतनामी डॉंग घेतले. किती आले? अंदाज? चक्क जवळजवळ १६ लाख, देशात नाही पण परदेशात तरी लाखोपती होण्याची संधी प्राप्त झाली. एवढे १६ लाख-आपणास वाटेल जवळची पिशवी वगैरे भरली की काय? मुळीच नाही. फक्त शर्टचा वरचा खिसा किंचित फुगला. तेवढीच छाती पुढे आली. कुणाची अभिमानाने, कुणाची शौर्याने वा गर्वाने, आमची मात्र डॉंग ने. आहे की नाही मजा !

सध्याचे हॅनोई पहावयाचे असेल तर प्रथम शहराच्या मध्यवर्ती भागातच असलेले युद्ध साहित्याचे वस्तु संग्रहालय हे पहावयासच हवे. एका प्रचंड मोठ्या वास्तूत असलेले War Museum. हे दर्शनी भागातच अमेरिकेच्या बी ५२ या लढाऊ विमानांच्या प्रचंड ढिगाऱ्याच्या रूपाने आपले स्वागत करते. व्हिएतनामी जनतेची या महासत्तेशी मार्च १९७५ पर्यंतची लढत या वस्तुसंग्रहालयाच्या प्रत्येक कलाकृतीत, फोटोमध्ये व जतन केलेल्या अवशेषांमध्ये प्रखरपणे जाणवत होती. याच लढाऊ विमानांनी पॅरिसमध्ये अमेरिकेच्या फौजा माघारी घेत असलेल्या प्रस्तावावर सह्या होत असताना हॅनोईवर प्रचंड बॉम्ब वर्षाव केला होता. घरे बेचिराख झाली. रस्ते निर्मनुष्य झाले. वॉर म्युझियम मध्ये काचेच्या कपाटात ठेवलेले लहान मुलांचे कपडे, खेळणी, वह्या-पुस्तके-पेन-पेन्सिली व कुटुंबाचे फोटो - पहात असताना मन हेलावून जात होते.

आता ठरवले ! चला खिसा रिकामा करू या! पायी हिंडूनच सात दिवसात पूर्ण शहर पाहिले. वस्तु संग्रहालयातील हॅनोई व आपण डोळे भरून पहात असलेली हॅनोई....विश्वासच बसत नव्हता. मार्च १९७५ पर्यंतची हॅनोई चित्ररूपात बंद होती व बी ५२ च्या संहारातून निर्माण झालेली हॅनोई मला खुणावत होती. कसे निर्माण झाले असावे हे सुंदर शहर ! प्रश्न अनेक .... पण उत्तर एकच ! हे माझे राष्ट्र आहे अन् ही माझ्या मातृभूमीची राजधानी म्हणजे हृदय आहे - ही पुन्हा आम्ही निर्माण करणारच तीही पहिल्यापेक्षाही सुंदर. ही जिद्द तेथील प्रत्येक नागरिकाची होती. मदतीच्या भीकेपेक्षा ही जिद्दच त्यांच्या कार्य उभारणीस प्रोत्साहित करणारी ठरली.

या शहरातील रस्ते प्रशस्त रूंद, जवळपास त्याच आकाराचे दुतर्फा फुटपाथ, रस्त्यावर चार चाकी वाहने कमी आढळली. रस्त्याच्या कडेला कुठेही पार्किंग नाही (मला

माझे ठाणे शहर आठवले) दुचाकी वाहनांचे पार्किंग फुटपाथवर, ठराविक अंतरावरच पे अॅन्ड पार्क पद्धतीने केलेले. फुटपाथवर अथवा रस्त्याच्या कडेला कुठेही उपासना स्थळ आढळले नाही. (आपल्या देशात एखादे शहर तरी अपवाद असेल का?) मात्र काचेच्या खोलीत असलेले स्वयंचलित दूरध्वनीचे बूथ ठराविक अंतरावर बरेच दिसून आले.

शहरातील सुंदर-सुंदर इमारती- मोठमोठे रस्ते कित्येक अगणित चौक व प्रचंड मोठमोठी हॉटेल्स हे हॅनोईचे वैशिष्ट्य, हॅनोईस चौकांचे व हॉटेल्सचे शहर का म्हणू नये असा मोह कित्येक वेळा मनात निर्माण होतो. प्रत्येक चौकात सिग्नल प्रणाली आहे. पण कालावधी फक्त ३० सेकंद. व्हिएतनामी लोकांना युद्ध समाप्तीनंतर अधिक चपळ व कार्यक्षम बनवण्यासाठी येथील सरकारने अनेक योजना तयार केल्या. त्यातीलच ही योजना असावी का ? विचारावेसे वाटले, पण कुणाला? चौकात वाहतुक पोलीसच नाहीत. सर्व कसे शिस्त बद्ध, समजुतदात पद्धतीने चाललेले. हजारो लोक स्वयंचलित दुचाकीवरून सकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत प्रवास करतात. तेही इंच इंच अंतर राखून आहे की नाही आश्चर्य ! बस हे सार्वजनिक वाहतुकीचे साधन मुळी अस्तित्वातच नाही. मोटारबाईक स्वस्त-सर्वांना परवडणाऱ्या. चीनने ही बाजारपेठ पूर्णपणे आपल्या कब्ज्यात घेतलेली आढळली. सार्वजनिक वाहतूक फक्त दोन माध्यमातून, मोटारबाईक व टॅक्सी. मोटारबाईकचा उपयोग मुले-मुली या कामासाठी करतात. हॅलो या शब्दाचा वापर करून पाठीमागच्या सीटचा उपयोग प्रवाशासाठी केला जातो. टॅक्सी फारच छान वाटल्या. ड्रायव्हरच्या शेजारीच ग्राहकास दिसेल असे डिजिटल मीटर टॅक्सीच्या आतच असते. त्याच्या शेजारी ड्रायव्हरचा फोटो व माहिती, पत्ता इत्यादी. प्रवासी आत बसला की ड्रायव्हर त्याच्या असोसिएशनच्या ऑफिसशी फोनवर संपर्क करतो व तो कोठे निघाला आहे हे कळवतो. हीच माहिती, याच माध्यमातून पोलीस नियंत्रण कक्षाकडे जाते. या पद्धतीची संपर्क यंत्रणा तुमचा प्रवास चालू असताना सतत कार्यरत असते. परदेशी प्रवाशास सुरक्षित वाटण्यासाठी ही पद्धत मला फार आवडली. मीटरच्या डिजिटल आकड्यांच्या सहाय्यानं आपण पैसे द्यावयाचे. वादावादी- फसवाफसवी नाही. गाडी थांबली की ड्रायव्हर खाली उतरून दरवाजा उघडतो. तुमचे सामान तुमच्या हवाली करतो. तुम्हास डिकी-गाडी रिकामी असल्याचे दाखवतो. असा अनुभव मला माझ्या टॅक्सी प्रवासात वारंवार आला. ( मुंबईतील अनुभव कसा सांगू ?).

हॅनोईला भिकारी नाहीत, रस्त्यावर बेवारशी कुत्रे, पाळीव प्राणी कोठेच दिसले नाहीत. सर्व रस्ते स्वच्छ. कुठेही केरकचरा नाही. अंदाजे २० फुटांवर रस्त्याच्या बाजूला टाकण्यासाठी बंद पेट्या दिसल्या. विडी सिगारेटची दुकाने कोठेच दिसली नाहीत. मात्र रस्त्याच्या कडेला छोट्या काचेच्या खोल्या धूम्रपानासाठी राखून ठेवलेल्या आढळल्या. शहरात धूम्रपान फारच कमी आढळले. हवा अतिशय स्वच्छ, कारखाने सर्व दूर शहराबाहेर, रस्त्यावरच ठराविक अंतरावर काचेच्या रूममध्ये पोलीस दिसतो. पण तो काही काम करत असलेला दिसला नाही. बहुधा त्याला काहीच काम नसावे, सार्वजनिक वाहतुकीमध्ये सायकल रिक्षा आढळल्या. मात्र रचना उलटी म्हणजे प्रवासी पुढे व रिक्षावाला मागे.

टॅक्सीवाले प्रामाणिक असल्याने व निष्क्रिय भिकारी नसल्यामुळे मला हॅनोईतील हॉटेल्स तुडुंब भरलेली आढळली. टूरिझम मधून हा देश अमाप डॉलर्स कमवत आहे. शहरातील प्रेक्षणीय, ऐतिहासिक ठिकाणे अतिशय स्वच्छ, देखणी आहेत. त्यांचे जतनही उत्तम पद्धतीने केले आहे. मला हॅनोई फ्लॅग टॉवर, होचिमिन्ह स्मारक, लेनिन पार्क ही ठिकाणे फारच आवडली. शहराच्या मध्यभागी असलेला 'हेअनकिम' हा सुंदर तलाव हॅनोईच्या नागरिकांचे निसर्गावर असलेल्या प्रेमाचे उत्तम उदाहरण आहे. (ठाणे-

मुंबईतील तलावाबरोबर तुलना करण्याचे धाडस मी करू शकत नाही.) पार्कमध्ये सुद्धा - आराम करणारे कुणीच आढळले नाहीत. खेळ, जॉगिंग यातच सर्व कार्यरत दिसले. कुठेही खाण्या-पिण्याचे स्टॉल्स दिसले नाहीत.

हॅनोई शहरात अनेक स्ट्रीटस् आहेत. प्रत्येक स्ट्रीट ठराविक वस्तुसाठी प्रसिद्ध आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंची बाजारपेठ फारच छान वाटली. काही स्ट्रीट चामड्याच्या वस्तूंसाठी, स्टेशनरी, क्राफ्टसाठी प्रसिद्ध आहेत. वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक दुकानात फक्त मुलीच नोकरीच्या रूपाने आढळल्या. अमेरिकन युद्धामुळे स्त्री-पुरुष गुणोत्तर अजूनही विस्कटलेलेच आहे. बहुतांशी घरातील मुली त्यांच्या घरासमोरच फुटपाथवर एका ठराविक खाद्य पदार्थांचा स्टॉल लावतात. साहित्य : शेगडी, तो तयार करावयाचा पदार्थ व ग्राहकासाठी ४" उंचीचे ५-६ स्टूल - अर्धवर्तुळाकार ठेवलेले. ग्राहकाने यावे व त्या स्टूलवर बसावे - तो पदार्थ गरम गरम हातात घेऊन खावा.पैसे द्यावे अन् जावे. पदार्थ संपले की ती मुलगी फूटपाथ स्वच्छ करून घरात जाते. दर ५-६ घराच्या अंतरावर घराच्या पडवीमध्ये सूप व नूडल्सचा स्टॉल असतो. पद्धत तीच. फक्त ग्राहकास डीश व नूडल्स खाण्यासाठी काड्या दिल्या जातात. घरातील ६ वर्षांच्या मुलापासून ते ९० वर्षांच्या वृद्धापर्यंत सर्वांचे सहकार्य असते. पुरुष मात्र घराबाहेर नोकरी निमित्त जातात.

भाजी मार्केटची मजा वेगळीच आहे. ती अरुंद बोळीत दाटीवाटीने आढळली. थेथेच भाज्या खरेदी करून स्त्रिया व मुली - खांद्यावर कावड घेऊन विकतात. फळेही याच पद्धतीने विकली जातात. शहरात फेरीवाले कुठेही नव्हते. कचरा कंटेनर मध्ये साठवला जातो. कंटेनर भरला की त्यावर पिवळा कपडा टाकतात. सकाळी ८ च्या आत कचरा हटवला जातो. इंग्रजीचा वापर फक्त पर्यटकांपुरता तोही पेन व कागदाच्या लहान तुकड्याच्या माध्यमातूनच. अशाच एका भव्य दुकानात जाण्याचा योग आला. त्या मालकाने आम्ही भारतीय असल्याचे ओळखले व गुजरातच्या भूकंपाबद्दल हळहळ व्यक्त केली व त्याच्यातर्फे १० लाख डाँग देऊ केले. आपल्याच देशात आपण अशा प्रसंगात कित्येक वेळा अलिप्त राहतो. हॅनोईतील या प्रसंगाने माझ्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

या शहरातील सर्व स्त्रिया मला कार्यरत दिसल्या. नीटनेटके -टवटवीत-स्वच्छ कपडे, त्यावर कोट घातलेले, निरोगी तजेल कांतीचे छोट्या चणीचे स्त्रीपुरुष आम्हा सर्वांचे लक्ष पटकन वेधून घेत होते. रस्त्यावर, फूटपाथवर उगीच कुणी घुटमळत नाही. प्रत्येक आबालवृद्ध चैतन्यशील मदत प्रिय वाटला. विमानतळाच्या वाटेवर भातशेती करणाऱ्या स्त्रिया-हॅनोई नदीमध्ये मासेमारी करणारे पुरुष-अशी कितीतरी कार्यक्षमतेची चित्रे मी नजरेत साठवली.

हॅनोईमध्ये फिरताना मला भारल्यागत झाले होते. पण त्याचबरोबर पायाखालून दबलेल्या असंख्य हुंदक्यांचे आवाज मला वास्तवतेची जाणीव करून देत होते व पुन्हा पुन्हा वॉर म्युझियम कडे खेचत होते. केवढा हा विरोधाभास! नियतीने घडवलेला !!

स्वच्छता, प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची प्रवृत्ती, स्वावलंबन, राष्ट्र प्रेम, स्त्रीसन्मान यानेच राष्ट्र पुढे येते-घडले जाते. पण यासाठी प्रत्येक वेळी जपानकडेच का बोट दाखवावे लागते ? या जगाच्या पाठीवर अशी कितीतरी राष्ट्र आहेत त्यातच एक व्हिएतनाम व त्याची पिटुकली राजधानी हॅनोई : एक राखेतून निर्माण झालेले सुरेख शिल्प.

**डॉ. नागेश शं. टेकाळे**
डॉक्टर्स क्वार्टर्स, बिल्डिंग क्र. ३/४/१८,
इ.एस.आय.एस. कॅम्पस्, मुलुंड (प.)
दूरध्वनी : ५६४६८७९

• • •

# रामकृष्ण मठ (ग्रंथालय)

*प्रत्येक शहराचा इतिहास, हा त्या शहराच्या सनावळ्या, राजे, दरबारी, वाडे, इमारती, ऐतिहासिक वास्तू इ. मध्ये सामावलेला असतो. त्यात महाराष्ट्रातील नागपूर हे प्राचीन, इतिहासाचा आलेख समोर सादर करणारे शहर सुद्धा याला अपवाद नाही. नागपूर शहराच्या त्रिशताब्दी वर्षाच्या निमित्ताने ह्या नागपूरात काय दडलेलं आहे हे जाणून घ्यायची इच्छा आणि या शहराचे भूषण असलेल्या काही संस्था यांचा आढावा घेताना डोळ्यासमोरून झळकणारी एक धार्मिक संस्था लक्षात आली. ती रामकृष्ण मठ या नावाने प्रसिद्ध आहे. बऱ्याच जणांना तिच्या कार्याची जाण आहे. ओळख आहे. परंतु या संस्थेचा एक महत्त्वाचे अंग असलेला भाग म्हणजे या संस्थेचे ग्रंथालय. केवळ एक 'धार्मिक संस्था' एवढीच या संस्थेची ओळख न राहता इतर जनतेबरोबरच इतरांनाही तिचे महत्त्व, ओळख आणि तिच्या कार्याचा परिचय व्हावा या एकाच हेतूने या ग्रंथालयाचा हा परिचय आपणा सर्व वाचकांसाठी. - संपादक*

रामकृष्ण ग्रंथालय उदयाला येण्यामागे ज्या दृष्टीने वाटचाल झाली त्यादृष्टीने विचार करता, रामकृष्ण संघ, नागपूर याची कल्पना काय होती हे जाणून घेणे महत्त्वपूर्ण ठरेल.

**रामकृष्ण संघ :**

रामकृष्ण संघ ही स्वामी विवेकानंदांनी, सद्गुरुंच्या संकल्पनेला मूर्त स्वरुप दिलेली ही एक लोकोपयोगी धार्मिक संघटना होय. भगवान रामकृष्ण परमहंस काशीपूर येथे मृत्यु शय्येवर असताना सर्व शिष्यांना एकत्र बोलावून आपल्या शिष्यांनी आत्मोद्धाराबरोबरच, लोकोद्धार करण्याच्या दृष्टीने भगवान रामकृष्णांनी संघटनेच्या स्थापनेबद्दल आपले विचार मांडले. त्यांनी मृत्यूपूर्वी इ.स. १८५८ च्या डिसेंबर महिन्यात अकरा शिष्यांना जाती व वर्ण यांचा विचार न करता एकत्र बोलावून स्वहस्ते भगवी वस्त्रे दिली. हीच लहानशी घटना म्हणजेच प्रत्यक्ष ''रामकृष्ण संघाची'' प्रस्थापना होय.

इ.स. १८९२ मध्ये बराहनगरातील मठ, अलमबाजार येथे हलवून स्वामीजींनी आपल्या सर्व संन्यासी व गृहस्थाश्रमी गुरुबंधूंना एकत्र करुन त्यांच्या सहाय्याने व सहकार्याने दि. १ मे १८८७ या दिवशी 'दि. रामकृष्ण मिशन असोसिएशन' या नावाची एक समिती स्थापन केली. या समितीचा उद्देश वेदान्त शिक्षणाला उत्तेजन देणे, सर्व-धर्म समन्वयाचे वातावरण तयार करणे, कला, उद्योगधंदे, अनाथाश्रम, शिशुगृहे, प्रयोगशाळा, दवाखाने आणि ग्रंथालये इ. लोकोपयोगी संस्था निर्माण करणे हे होते. याच उद्देशाने रामकृष्ण संघाद्वारे मठ व मिशनच्या शाखा शैक्षणिक व परोपकारिक कार्य करण्यासाठी विविध ठिकाणी देशात व परदेशात स्थापन करण्यात आल्या.

याच रामकृष्ण संघाची एक शाखा नागपूर येथे १९२५ रोजी स्वामी शिवानंद यांचे हस्ते रामकृष्ण मठ आश्रम, धंतोली, नागपूर स्थित विविध विभाग प्रस्थापित होऊन सुरु झाली.

**रामकृष्ण मठ नागपूरचा इतिहास व पार्श्वभूमी -**

नागपूरच्या क्रॅडॅक टाऊन (सद्यःस्थितीत असलेले नाव धंतोली) विभागात श्री. आनंद मोहन चॅटर्जी (चौधरी) नावाचे तरुण भक्त होते. भगवान श्रीरामकृष्ण -

विवेकानंदाच्या जीवनोपदेशाचा त्यांच्या मनावर खूप प्रभाव होता. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातच श्रीरामकृष्णाचा जन्मोत्सव सीताबर्डी भागात संगम पुलाजवळील मुरलीधराच्या मंदिरात साजरा करीत असत. त्यानंतर मार्च १९२३ मध्ये धंतोली स्थित "रामकृष्ण संघाच्या" कायम शाखेची स्थापना व्हावी या दृष्टीने श्री. आनंद मोहन यांनी एक जमिनीचा तुकडा खरेदी केला. ती जागा म्हणजेच आज नागपूरात अस्तित्वात असलेला रामकृष्ण मठ आश्रम होय. या संस्थेचा स्तर धार्मिक स्वरुपाचा असून ही संन्याशांची धार्मिक खाजगी संस्था आहे. येथील संन्यासी वर्ग संस्थेचे प्रमुख असतात. संस्थेत एकुण १२ संन्यासी प्रमुख असून ते संस्थेच्या विविध विभागाची जबाबदारी व कार्य निरंतर चालू ठेवतात.

रामकृष्ण मठाचे नागपूरचे प्रथम संस्थापक अध्यक्ष स्वामी भास्करेश्वरानंद महाराज होते. त्यांच्या पश्चात द्वितीय अध्यक्ष स्वामी व्योमरुपानंद महाराजांनीही आध्यात्मिक परंपरा कायम ठेऊन सध्या मठाचे अध्यक्ष स्वामी ब्रह्मस्थानंदजी महाराज आपले कार्य करीत आहेत. रामकृष्ण मठ व मिशनचे मुख्य ब्रीद वाक्य " आत्मनो मोक्षार्थ जगद्हितायच" आहे. याचा अर्थ स्वतःला मुक्ती मिळावी आणि जगाचे कल्याण व्हावे अशीच कृती हातून घडावी. म्हणून प्रत्येक जण आपले काम ईश्वराचे काम समजून अगदी मनापासून जास्तीत-जास्त चांगले कसे होईल हे पहातो. संस्था "शिवभावे जीवसेवा" हा मूलमंत्र समोर ठेवून चालू आहे. मठाचे विविध सेवाकार्य व निरनिराळे उपक्रम अतिशय प्रसन्न आणि शांतपूर्ण वातावरणात सुरु असतात. त्याचाच भाग म्हणून रामकृष्ण मठ नागपूर येथे विविध विभाग अस्तित्वात आहेत.

१. धर्मार्थ दवाखाना
२. फिजियोथेरपि युनिट
३. विवेकानंद विद्यार्थी भवन
४. शिवानंद सभागृह
५. पुस्तक विक्री विभाग
६. प्रकाशन विभाग

या विविध विभागांपैकी व रामकृष्ण संघाच्या कार्य व सेवा, उपक्रमांपैकी एक विभाग म्हणजे संस्थेचे ग्रंथालय होय.

**रामकृष्ण मठ ग्रंथालयाची पार्श्वभूमी व इतिहास :**

रामकृष्ण संघाचा ग्रंथालये स्थापने मागील उद्देश असा की, ग्रामीण जनता व समाजाचा, देशाचा उद्धार व विकास होण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील वर्गांना सुद्धा शिक्षणाचा प्रसार व प्रचार होण्याच्या दृष्टीने शिक्षणक्षेत्र आणि विद्यार्थी यांच्याकडे अधिक लक्ष देण्यास प्रारंभ केला. त्यातूनच रामकृष्ण संघातर्फे १९१९ मध्ये उद्देश साध्य होण्यासाठी " रामकृष्ण मिशन स्टूडंटस् होम" या अधिकृत केंद्राची स्थापना करण्यात आली. या विद्यार्थी भवनातून होणारे संस्कार, शिस्त व परीक्षेत मिळवलेले यश, यामुळे समाजातील सामान्य नागरिकांचा या विद्यार्थी भवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. त्यानंतर या भवनातून राहणाऱ्या विद्यार्थ्यांमधून उत्तम नागरिक निर्माण झाले. याचकाळात रामकृष्ण संघाने विद्यार्थी भवनाला बौद्धीक संप्रदायाची जोड देऊन विविध शाखांमध्ये ग्रंथालयांची उभारणी केली आहे.

**ग्रंथालय स्थापनेचा उद्देश :**

समाजामध्ये धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक ज्ञानदायक वाङ्मयाची लोकात आवड निर्माण करणे. ग्रंथालयाचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी व्हावा तसाच सामान्य नागरिकांना व्हावा यादृष्टीने संस्थेच्या ग्रंथालयांत विविध विषयावरील ग्रंथ ठेवले जातात. त्याच प्रमाणे अभ्यासक्रमाला उपयुक्त पाठ्यपुस्तकांचा सुद्धा समावेश करुन रामकृष्ण मठ ग्रंथालयाद्वारे तरुण पिढीशी व नागरिकांशी संपर्क साधण्याचे एक उपयुक्त माध्यम म्हणून ग्रंथालयाकडे पाहिले आहे.

**रामकृष्ण मठ ग्रंथालय स्थापना / ओळख :**

रामकृष्ण मठ ग्रंथालय नागपूरची सुरुवात इ.स. १९३२ रोजी, सध्या अस्तित्वात असलेले 'विवेकानंद विद्यार्थी भवन' परिसरात ३०० ग्रंथांनी झाली. त्यानंतर १९५८ रोजी संस्थेमार्फत नवीन स्वतंत्र प्रशस्त ग्रंथालयाची दुमजली इमारत बांधकामास सुरुवात करुन या नवीन ग्रंथालय इमारतीत ५०,००० ग्रंथ ठेवण्याची व्यवस्था होईल यादृष्टीने आराखडा तयार करुन १९५९ रोजी ही इमारत पूर्णत्वास आली. या इमारतीचे उद्‌घाटन ५-१-१९५९ रोजी मुंबई प्रान्ताचे मुख्य श्री. वाय. पी. चव्हाण यांच्या हस्ते झाले. १९५९ च्या सुरुवातीला १४,००० ग्रंथ व १०० नियतकालिकांची व्यवस्था होती. आज सद्यःस्थितीत ग्रंथालयाची स्वतंत्र प्रशस्त दुमजली इमारत असून इमारतीच्या खालील भागात ग्रंथालय, वरील मजल्यावर वाचकांकरिता निःशुल्क वाचनालय कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. इमारत रामकृष्ण आश्रम मार्ग, धंतोली, नागपूर - १२ येथे असून ग्रंथालय व वाचनालय कक्ष रोज सकाळी ८ ते १०.३० आणि संध्याकाळी ५ ते ७.३० पर्यंत चालू असते.

**ग्रंथालयातील कक्ष व्यवस्था व व्यवस्थापन :**

ग्रंथालयात ग्रंथसंग्रहण कक्ष व्यवस्था व विविध कक्षांची निर्मिती त्यानुसार वाचन साहित्याची मांडणी शास्त्रीय दृष्टीकोनातून नियोजित व्यवस्था केलेली आहे. रामकृष्ण मठ ग्रंथालयात प्रवेश करताच ग्रंथालयाच्या उजव्या बाजूला ग्रंथालयाचा अभ्यास कक्ष आहे. कक्षात शांत, अभ्यास वाचनास पोषक असे वातावरण, योग्य प्रकाश व्यवस्था असून विद्यार्थींकरिता स्वतंत्र कक्ष आहे. या कक्षाचा उपयोग अनेक महाविद्यालये आणि शाळेतील गरजू विद्यार्थींना होतो. या कक्षाला लागून संदर्भ कक्ष ग्रंथालयांत आहे. या कक्षाचा उपयोग दररोज सुमारे ४०-५० वाचक व अभ्यासक लाभ घेतात.

वरील सर्व कक्षांव्यतिरिक्त ग्रंथालयच्या वरील भागात वाचनालय कक्ष असून विविध विषयांवरील नियतकालिके, वर्तमानपत्रे, धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक हिंदी, मराठी, इंग्रजीबरोबरच बंगाली साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या वाचनकक्षाचा सुमारे १००-१२५ वाचक लाभ घेतात.

**ग्रंथालयातील सेवक वर्ग :**

रामकृष्ण मठ ग्रंथालया खालील प्रकारे सेवकवर्गाची संख्या आहे.-

१. ग्रंथालय प्रमुख - १ पदवीधर (संन्यासी)

२. प्रशिक्षित सेवक - १ बी.लिब. आणि आय. एस्सी.

३. अर्धप्रशिक्षित सेवक - २ एच्.एस.सी.

४. सेवाधारी व्यक्ती - २ सोयीनुसार ग्रंथालयात सेवा देतात (या व्यक्तींना ग्रंथसंग्रहाबद्दल ज्ञान आहे. शिवाय या व्यक्ती पदवीधर आहेत.)

रामकृष्ण मठ ग्रंथालय विभागाचे प्रमुख स्वामी ज्योतिष्यानंद (मठाच्या १२ संन्यासी पैकी १) असून संस्थेच्या विविध विभागांपैकी ग्रंथालयाच्या संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. ग्रंथालयातील संपूर्ण संग्रहाचा परिचय, विशेषतः रामकृष्ण प्रकाशन, वेदान्त, उपनिषद, धर्म, तत्त्वज्ञान, सामाजिकशास्त्र इ. विषयी प्राथमिक व सखोल माहितीची त्यांना ओळख आहे. ग्रंथालयातील संग्रहाबद्दल विस्तृत माहिती हवी असल्यास वाचकांना मदत करण्यास सदैव प्रयत्नशील असतात. ग्रंथालयाचा ग्रंथ आणि व्यतिरिक्त खर्च रामकृष्ण मठ ग्रंथालय वर्गणीद्वारे करतात.

**ग्रंथालयातील ग्रंथनिवड :**

रामकृष्ण मठ ग्रंथालयात ग्रंथनिवड प्रक्रिया, ग्रंथाच्या निवडीचा सर्वाधिकार ग्रंथालय प्रमुखांना दिलेले आहेत. ग्रंथालयात संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट ग्रंथालयाचे स्वरुप लक्षात घेऊन ग्रंथनिवड करीत असतात. ग्रंथालयातील वाचकांनी तसेच संस्थेतील मान्यवर व्यक्ती विशिष्ट विषयावरील तज्ञ व्यक्तींच्या सूचनेनुसार ग्रंथालयात ग्रंथनिवड करण्यात येते. यावरोबरच प्रकाशनसूची, पुस्तक परीक्षणे आणि ग्रंथप्रदर्शनामधून सुद्धा ग्रंथांची निवड केली जाते. या संस्थेच्या प्रकाशन विभागामार्फत नवीन ग्रंथावलींचे सुद्धा प्रकाशन होते.

**ग्रंथालयांतील ग्रंथसंग्रह :**

आज रामकृष्ण मठ ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाद्वारे भारतीय संस्कृती जतन करणारी, भगवान रामकृष्ण, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ व मिशन यांचे उद्दिष्ट कार्य पूर्णत्वास नेणारे व त्यांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्य चालले.

सद्य:स्थितीत ग्रंथालयात हिंदी, इंग्रजी, मराठी, बंगाली तसेच अन्य भाषांचे ४२,००० ग्रंथ (१९९९-२००० नुसार) ग्रंथसंपदा, ग्रंथालयात आहे. समाजातील विविध वाचकांकरिता संदर्भग्रंथ, दुर्मिळ ग्रंथ, सामान्य विज्ञान, चरित्रे, तत्वज्ञान, विविध धर्म, इतिहास इ. स्वरुपाचे ग्रंथ ग्रंथसंग्रहात उपलब्ध आहेत. यावरोबरच रामकृष्ण मठ व मिशनच्या विविध शाखेतील प्रकाशनांचे ग्रंथ व नियतकालिकांचे बांधीव संच ग्रंथालयांत संगृहीत आहेत. याशिवाय विविध भाषेतील १७ वृत्तपत्रे व ३५ नियतकालिके उपलब्ध आहेत. या साहित्यात विशेषत: सावरकर, हिटलर, गांधीजी, सुभाषचंद्रबोस, स्वामी विवेकानंद, भगवान रामकृष्ण इ. महान व्यक्तींच्या चरित्राबरोबरच भगवद्गीता, बायबल, कुराण, संतांचे वाङ्मय आणि प्रत्येक धर्मांचे तत्वज्ञान व मानसशास्त्राशी संबंधित अभ्यास यावर ग्रंथ आहेत.

या ग्रंथसंग्रहाची उपलब्ध आकडेवारी खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| इंग्रजी - | २०,३१० |
| मराठी - | ११,५४२ |
| हिंदी - | ६४६८ |
| बंगाली - | २२८५ |
| संस्कृत - | ३१२० |
| इतर - | ५५२ |

ग्रंथालयांतील वाचकांची संख्या १५०० पेक्षा जास्त असून त्यात डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक इ. समावेश असल्याने त्यांच्या दृष्टीने आवश्यक असलेले वाचनसाहित्य या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. धार्मिक ग्रंथालय म्हणून उल्लेख केल्या जाणारे हे ग्रंथालय आज संपूर्णपणे संगणीकृत झाले असून संस्थेच्या विविध सेवाधारी व्यक्ती, सेवकांद्वारे रामकृष्ण मठ ग्रंथालयाचे सेवाकार्य निरंतर चालू आहे.

**रामकृष्ण मठाचे प्रकाशन :**

रामकृष्ण मठाने आपल्या प्रकाशन विभागात मराठी व हिंदी मिळून १५० ग्रंथांची जी झेप घेतली आहे आणि त्यात जीवन विकास मासिकाचे दहा हजारावर नियमित वर्गणीदार आहेत. अशा या ग्रंथालयाला कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त न होता संस्थेद्वारे रामकृष्ण मठ ग्रंथालयाने व्यवस्थापकीय, संघटनात्मक प्रगती केली आहे. तसेच ग्रंथालयात समाजातील ग्रंथालयांशी संबंधित तज्ञ व्यक्ती आणि ग्रंथालयात येणाऱ्या सेवाभावी व्यक्तींच्या आधारावर कोणतेही नियंत्रण न राहता हे ग्रंथालय उत्कृष्टपणे सेवा देत आहे.

वाचकांना ग्रंथालयामार्फत सेवा, धर्मार्थ दवाखाना आणि समाज जागृतीसाठी चालविले जाणारे प्रयत्न इ. सर्व बाबींमध्ये अग्रेसर असलेले हा मठ व त्याचे ग्रंथालय सध्याच्या आधुनिक काळातील प्रसार माध्यमांपासून दूर आहे. त्याला या ठिकाणी थारा नाही. रामकृष्ण मठाचे कार्य निरंतर चालूच आहे. समन्वयाच्या संस्काराचे केंद्र असलेली ही संस्था नकळतच आपल्यावर संस्कार करून जाते आणि आपल्याला योग्य मार्ग दाखविते. जीवन विकासाच्या माध्यमातूनच ह्या संस्थेचे व्यक्तिमत्त्व फक्त स्वत:करिताच फुलत न राहता इतरांना सुद्धा जीवन विकासाच्या आधाराबरच फुलण्याचा योग्य मार्ग दाखविणाऱ्या या मठाचा / ग्रंथालयाचा फायदा नागपूरप्रमाणे इतरांना सुद्धा निश्चित घ्यावा असे प्रकर्षाने वाटते.

**सुधीर बोरकर, मेधा हेमंत खरे**

विको लेबॉरटरीज, नागपूर

medhakhare@yzhoo.com

•••

दिशा

- वैचारिक व्यासपीठ

- विचारांना प्रवृत्त करणारे नियतकालीक

## गुरुपौर्णिमेचं चिंतन

जीवनात शिस्तीची नितांत गरज आहे. व्यवस्थापनाच्या आजच्या युगात तर सर्व गोष्टींचे नीट व्यवस्थापन ही प्रत्येकाची महत्त्वाची गरज ठरली आहे. त्यासाठी शिस्त असणे, ती आतून आलेली असणे गरजेचे आहे.

जीवनातील असंख्य दुःखे, प्रश्न या सर्वांच्या मुळाशी ही बेशिस्तच आहे. प्राणिजीवनात अशी बेशिस्त कधीच दिसत नाही. वाटेल तसे बोलणे, कोणतेही चांगले संकेत न पाळणे यातून आपण प्रश्न गंभीर करतो. खाण्याचेचं उदाहरण घ्या. मितआहार हा महत्त्वाचा आहे हे माहीत असले तरी आपण अनावश्यक व बेसुमार खातो. प्राणी स्वत:चे पोट भरल्यानंतर चुकूनही अन्नाला शिवत नाहीत. प्राणी जीवन व निसर्गाचा असा समतोल विचार केला तर असं लक्षात येईल निसर्ग हाच खरा शिक्षक आहे. त्याच्याकडून शिकायला हवं. गुरुपौर्णिमे निमित्ताने निसर्गातील प्रत्येक घटकाला आपण गुरु मानायला हवं.

- झरोका

•••

# भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊ पाहत आहे का ?

*भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनू पहात असल्याची पूर्वापार आलेली खंत या लेखात व्यक्त झाली आहे. त्याबरोबरच यावर काही उपाय आहेत का याचाही लेखकाने शेवटी विचार केला आहे. - संपादक*

जगातील प्रमुख भ्रष्टाचारी देशांच्या क्रमवारीत भारताचे पहिल्या दहा क्रमांकामध्ये स्थान आहे. ही गोष्ट आपल्या देशाला खचितच भूषणावह नाही. भ्रष्टाचार हा जगातील सर्वच देशांमध्ये बोकाळलेला आहे हे निर्विवाद. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष निक्सन यांच्या कारकिर्दीत घडलेले वॉटरगेट प्रकरण सर्वश्रुत आहे. अशा प्रकारची स्कॅंडल्स प्रत्येक देशामध्ये कमी अधिक प्रमाणात घडत असतात. परंतु आपल्या देशामध्ये भ्रष्टाचाराची बजबजपुरी माजलेली आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते. वर पासून खाल पर्यंत आणि सर्वच क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार धुमाकूळ घालीत आहे. बोफोर्स तोफा खरेदी घोटाळा, हर्षद मेहताचा शेअर घोटाळा, पशुखाद्य (चारा) घोटाळा, संरक्षण खात्यातील शस्त्रात व्यवहारातील तहलकाने उघडकीस आणलेला घोटाळा अशी घोटाळ्यांची मालिका न संपणारी आहे. हिशोबातील एका पैची चूक शोधून काढण्यासाठी संबंध रात्र जागणाऱ्या एकनाथ महाराजांची परंपरा आपल्याला लाभलेली आहे. मग त्यांची परंपरा पुढे चालविणारे वारसदार आपल्याकडे पुढे का निर्माण होऊ नयेत ?

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ब्रिटिशांच्या आमदानीत कडक शिक्षेच्या भीतीने का होईना भ्रष्टाचार त्या मानाने कमी प्रमाणात होता ही गोष्ट आपल्याला मान्य करावीच लागेल. सामाजिक नीतीमत्तेचा दर्जा आजच्याइतका खालावलेला नव्हता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर जगात सर्वत्रच चंगळवाद बोकाळला. सर्वजण कमीजास्त प्रमाणात भौतिक सुखांच्या मागे लागले. साधनांचा विधिनिषेध उरला नाही आणि त्यातूनच सामाजिक नीतीमूल्याच्या ऱ्हास-प्रक्रियेस सुरुवात झाली. आणि त्याची परिणती स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सर्वांगीण भ्रष्टाचारामध्ये झालेली आहे. लाच देणारा आणि लाच घेणारा दोघेही सारखेच दोषी असतात. परंतु सर्वात वाईट गोष्ट म्हणजे ह्याची जाणीव आजकाल कोणाला उरलेली नाही. भ्रष्टाचार हा सर्वांच्या इतका अंगवळणी पडलेला आहे की त्यात गैर आहे असे कोणालाच वाटत नाही. जणू काही भ्रष्टाचार हा आपल्या आधुनिक सामाजिक जीवनाचा अविभाज्य भागच बनलेला आहे. हळूहळू भ्रष्टाचार हा एकप्रकारे शिष्टाचारच बनू पहात आहे. ही समाजाच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. समाजाच्या धारणेमध्ये आणि मानसिकते मध्ये असा आमूलाग्र बदल कशामुळे झाला ?

आज असे एकही स्थान नाही की जिथे भ्रष्टाचाराचे प्राबल्य नाही. शेतकऱ्याला साधा ७/१२ चा उतारा मिळवण्यासाठी लाच द्यावी लागते. कुठल्याही सरकारी ऑफिसमध्ये 'पेपरवेट' ठेवल्या शिवाय फाईल पुढे सरकत नाही. रेशनिंग ऑफिसमध्ये रेशनिंग इन्स्पेक्टर्स ना 'चिरीमिरी' दिल्याशिवाय रेशनकार्ड सहजासहजी मिळत नाही. ब्लॉकचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी, स्टँप ड्युटी भरण्यासाठी म्हणजे शासनाला पैसे देण्यासाठी आपण जातो, त्यावेळी सुद्धा एकतर एजंटामार्फत जावे लागते किंवा पैसे द्यावे लागतात. हे कशाचे द्योतक आहे? मेडिकल रिएम्बर्समेंट साठी डॉक्टर्स आणि संबंधित शासकीय ऑफिसमध्ये कर्मचारी, अधिकारी यांना 'चहापाणी' द्यावे लागते. हे कशाचे निदर्शक आहे ? एम्प्लॉयमेंटचा नोकरीचा कॉल काढण्यासाठी देखील पैसे द्यावे लागतात. यातून शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र सुद्धा सुटलेले नाही. शिक्षक किंवा इतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करताना पैशाची मागणी केली जाते. गुणवाढीची प्रकरणे आपण नित्य ऐकत असतोच. विद्यार्थ्यांना स्वतःच्या खाजगी शिकवणी वर्गास येण्यास

भाग पाडणे, शिकवणी वर्गाला येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका किंवा अपेक्षित प्रश्न पुरवणे. उत्तरपत्रिकांच्या तपासणीमध्ये त्यांना झुकते माप देणे इ. गैर प्रकार शाळा कॉलेजमध्ये सर्रास घडत असतात. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पैसे घेऊन उत्तीर्ण करणे वगैरे गर्ह्य प्रकार यातूनच घडतात. मग त्यामुळे आपल्या शैक्षणिक संस्थेची गुणवत्ता खालावेल किंवा सार्वत्रिक परीक्षांच्या निकालावर त्याचा विपरीत परिणाम होईल, याचे कोणालाच सोयरसुतक नसते. कारण स्वार्थापलीकडे त्यांना दुसरे काही दिसत नसते.

या भ्रष्टाचाराला कोण जबाबदार आहे? भ्रष्टाचार कशाचा परिपाक आहे ? भ्रष्टाचाराला माझ्या मते दोन बाजू आहेत. कारण भ्रष्टाचार करणारा आणि भ्रष्टाचार करू देणारा. असे दोन घटक कुठल्याही भ्रष्टाचारामध्ये सहभागी असतात. अन्याय करणारा आणि तो सहन करणारा जसे सारखेच दोषी असतात. तसेच लाच देणारा आणि लाच घेणारा दोघेही भ्रष्टाचाराला सारखेच जबाबदार असतात.

आजकाल चंगळवाद सर्वत्र बोकाळल्यामुळे आणि माणूस भौतिक सुखांच्या मागे धावत असल्यामुळे, केवळ नोकरीतून मिळणाऱ्या वेतनामध्ये त्याचे समाधान होत नाही. कष्टाशिवाय पैसा मिळावा असे त्याला वाटत असते. पगाराव्यतिरिक्त काही 'अतिरिक्त प्राप्ती' व्हावी असे त्याला वाटत असते. यातूनच जे काम करणे हे त्याच्या ड्युटीचाच भाग असतो, त्यासाठी देखील संबंधीतांनी पैसे द्यावेत अशी त्याची अपेक्षा असते. नाहीतर मग संबंधित व्यक्तीची अडवणूक करणे, त्याला त्याच्या कामासाठी खेटे घालायला लावणे इत्यादी गोष्टी तो करु लागतो. यातूनच भ्रष्टाचार जन्मतो.

एखाद्या गुणवत्ता नसलेल्या विद्यार्थ्याला चांगल्या शाळा कॉलेजमध्ये प्रवेश हवा असतो, मग त्यासाठी तो पैसे द्यायला राजी असतो. याचा गैरफायदा शैक्षणिक संस्थांच्या चालकांकडून घेतला जातो. एखाद्या विद्यार्थ्याला अभ्यास न करता परिक्षेमध्ये उज्वल यश हवे असते. मग तो परीक्षेला 'डमी' बसवणे किंवा संबंधित एक्झामिनर - मॉडरेटर यांना गाठून गुण वाढ करणे इत्यादी वाम मार्गाचा अवलंब करतो. काही परीक्षक शिक्षक असले तरी शेवटी माणूस असल्यामुळे स्खलनशील असतात. त्यामुळे उत्तरपत्रिकांच्या तपासणीतून मिळणाऱ्या तुटपुंज्या मेहनतान्यामध्ये संतुष्ट नसतात. मग ते अशा विद्यार्थ्यांच्या पैशाच्या अमिषाला बळी पडतात आणि त्यातून गैरप्रकार घडत असतात. एखाद्याला पात्रता नसताना देखील विशिष्ट नोकरी हवी असते मग तो पैसे द्यायला तयार होतो.

पोलिस डिपार्टमेंटमध्ये नोकरी मिळवण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. मग नोकरी मिळाल्यानंतर खर्च केलेला पैसा कसा वसूल करावा ह्याचाच विचार त्या पोलीसांनी किंवा पोलीस निरीक्षकाने केला तर त्यात गैर काय ? ते मनुष्य स्वभावाशी सुसंगत आहे. ट्रॅफिक पोलिसांना 'कडकी' असले तर ते 'गिऱ्हाईक' शोधत असतात, असे गमतीने म्हटले जाते. आणि त्यात बरेच तथ्य आहे आणि अशी गिऱ्हाईके देखील त्यांना वाटेल तेवढी मिळतात. (लायसन्स नसणे, PUC नसणे इत्यादी) मग यातून पळवाट म्हणून पोलिसाला पैसे दिले जातात. ह्यामध्ये दोघांचाही फायदा असतो. पोलीस पावती फाडत नाही. संबंधित दोषी व्यक्तीला प्रत्यक्ष दंडापेक्षा कमी रक्कम भरावी लागते. 'एकमेका साहाय्य करु , अवघे धरु सुपंथ' असा हा मामला असतो. तीच गोष्ट विनातिकिट प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांकडून पैसे उकळणाऱ्या टी.सी. ची.

कुठलेही सरकारी काम म्हटले म्हणजे कागदी घोडे फार नाचवले जातात. नाना प्रकारचे दाखले लागतात. फायली इकडून तिकडे फिरत असतात. प्रत्यक्ष काम मात्र पुढे सरकत नाही. ह्याला संबंधित व्यक्ती कंटाळते, वैतागते. आजकालच्या धावपळीच्या जमान्यामध्ये व्यक्ती

पैशापेक्षाही वेळेला जास्त महत्त्व देते. त्यामुळे पुन्हा पुन्हा खेटे मारण्यापेक्षा 'शॉर्टकट्' शोधण्याच्या भरात, ती पैसे द्यायला तयार होते. याचा गैरफायदा संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी घेत असतात. आजकाल शासकीय कचेऱ्यांमधून हक्काने आणि उघडउघड लाच मागितली जाते याचे कारण हेच. लाच देणाऱ्यालाही वागत आहोत असे वाटत नाही. 'अमूक एक व्यक्ती पैसा खाते, पण आपले काम मात्र नक्की करते' असे गौरवोद्‌गार काढले जातात. लाच घेणाऱ्यालाही आपण काही पाप करत आहोत असे वाटत नाही. कारण पैसा घेऊन काम न करणारे महाभाग आजकाल उदयास येत आहेत. यातूनच भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊ पहात आहे. क्षुल्लक कामासाठी देखील वशिला लावणे, ओळखीचा उपयोग करून घेणे, उच्चपदस्थ व्यक्तींच्या चिठ्ठ्या आणणे इत्यादी गोष्टी यातूनच घडत असतात. साध्या बसच्या रांगेमध्ये देखील ओळखीची व्यक्ती पुढे असल्यास त्याचा लाभ उठवण्याची आजकालची सामाजिक मानसिकता यातूनच निर्माण झालेली आहे.

कष्टांनी मिळणाऱ्या पैशामध्ये समाधान मानणे, लायकीपेक्षा, पात्रतेपेक्षा, गुणवत्तेपेक्षा अधिक काही मिळावे अशी अपेक्षा न ठेवणे, थोडाबहुत त्रास झाला तरी तो सहन करण्याची सहनशीलता दाखवणे, कुठल्याही शासकीय किंवा अशासकीय कामामध्ये सुटसटीतपणा आणणे, कामाची प्रक्रिया सोपी करणे, केवळ कागदपत्रांची हालचाल न करता प्रत्यक्ष काम करणे इत्यादी गोष्टी घडल्यास भ्रष्टाचाराचे जरी पूर्णपणे निर्मूलन झाले नाही तरी त्याला बऱ्याच प्रमाणात आळा नक्की बसेल अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.

श्री. प्रभाकर द. अरदकर

सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

...

# संकल्प

दर महिन्याला एखादा तरी चांगला संग्राह्य ग्रंथ विकत घ्यावा, त्याचे घरात वाचन करावे. त्यावर आपल्या कुटुंबियांत, मित्रांत चर्चा करावी. असा संकल्प प्रत्येकाने केल्यास व तो पाळल्यास ग्रंथ प्रसार तर होईलच पण विचार प्रसार होईल, आपण एखादा विचार समजल्याने समृद्ध होऊ.

पशू व माणूस यातील महत्वाचा फरक माणूस ज्ञानोत्सुक असतो हा आहे. ज्ञान मिळवायचे असेल, मिळालेले ज्ञान वाढवायचे असेल तर वाचन साधनेला पर्याय नाही. पुस्तकांसारखा मित्र कोणीही नसतो, असे म्हणतात ते खरे आहे. त्यामुळे महिन्याकाठी एखाद तरी ग्रंथ विकत घ्यायला, वाचायला काय हरकत आहे ?

- झरोका

# 'एकादशी'

या महिन्यात आषाढी एकादशी आहे. त्या निमित्ताने दिशाच्या जुन्या वाचक व लेखिका, हितचिंतक सौ. वंदना प्रसादे यांचा हा छोटा लेख देत आहोत. - संपादक

उपास - उपवास या शब्दाचा आजकालच्या लोकांचा परिचय नाही असे म्हणता येणार नाही. बहुतेक माणसांचा आठवड्यातून एक वार तरी उपवासाचा असतोच. पण काहीजण अजिबात उपवास करीत नाहीत, पण नाही म्हणायला आषाढी एकादशी, कार्तिकी एकादशी, महाशिवरात्री हे उपास असतातच. काही लोकांना तर फक्त दुपारी बारा बाजेपर्यंत उपास केला तरी रोजच्या जेवणाच्या वेळेला, 'पोटात कावळे ओरडायला लागतात' 'भुकेने आगडोंब उठलाय', 'भूकबळी' या भूकेसाठी असलेल्या उक्त्या.

एकादशी म्हटली की घरातील सगळे उपासाला तयार. म्हणजे चारी ठाव वेगळे पदार्थ खायला मिळतात. तेवढाच चेंज. अहो, उपास म्हणजे नामस्मरण, अध्यात्मिक आचरण, पोटाला विश्रांती असे आमची आजी सांगायची पण आतातर बाजारात उपासाचे विविध पदार्थ असे पुस्तकच मिळते. अशी खासियत असलेल्या हॉटेलमध्ये तर भरपूर गर्दी असते.

पंढरीच्या वारीला अनेक जण जातात. सतत विठुचा गजर करीत भक्तीभावाने मैलोन-मैल चालतात. आपण जवळच एखाद्या देवळात जातो.

योगायोगाने आम्ही चौघं एकादशीला घरात होतो. मग आज एकादशीला खायला काय करणार यावर प्रत्येकाची मते. मुलीची ऑर्डर नेहमीच काय उपासाला खिचडी, आज काहीतरी वेगळे हवे. ते काही नाही, सकाळी नाश्त्याच्या वेळेला खिचडी ठीक आहे, दुपारी भगर आमटी करायचे ठरवले. यांना बटाटा प्रिय म्हणून बटाट्याची भाजी, मुलांसाठी शिंगड्याचा शिरा, सासुबाईंची आवड म्हणून थालिपीठ असे करता करता रोजच्या जेवणापेक्षा ताट जरा जास्तच सजले. एकमेकाच्या आवडीचे पदार्थ खायचे, पण टाकायचे तर नाही. गंमत असते की नाही ? ताटभर पंचपक्वान्न जेवायचे पण ते उपवासाचे म्हणून त्याला फराळ शब्द वापरायचा. म्हणजे आपले तेवढेच मानसिक समाधान.

या एकादशीच्या निमित्ताने बटाटे आणि एरवी आठवणीत असणाऱ्या रताळ्याचे भाव मात्र वाढतात. संध्याकाळी परत तोंडात टाकायला राजगिऱ्याची वडी, बटाट्याचे पापड, स्वीट डीश, फ्रुट सॅलड यांची तयारी आधीपासूनच. ऑफिसमध्ये मी इतकी वर्ष ऐकतेय काहीजण तर सांगतात घरात डबल करायला नको म्हणून घरात उपास, बाहेर पडल्यावर नाही. कोणताही पदार्थ समोर आला तरी आपण आपल्या मनावर ताबा ठेवायला शिकले पाहिजे. विचलित न होता एकाग्रता वाढवणे हा उपासामागचा खरा हेतू. पण 'एकादशी आणि दुप्पट खाशी' हे मात्र अगदी खरे ठरते. आपण इंद्रियांचे गुलाम आहोत हे अगदी नक्की. माणसाची जीभ हेच अनेक रोगांना आमंत्रण देते. कारण 'जिभेला पाणी सुटणे' 'जिभेचे चोचले' वाक्‌प्रचार सतत वापरले जात असतात.

सगळ्यांचा भरपेट फराळ झाला. त्यावर 'एरवी कोण खातंय !' असा स्वतःच्याच समाधानाचा शेरा मारुन झाला. मुलींच्या एकेक फर्माईश ऐकून त्यांच्या आजीचा 'सासरी कोण देईल गं, पानावर बसल्या बसल्या लोण्याचा गोळा' असा पोक्त टोला ! अशा गमती जमती चालल्या

होत्या. खरेतर 'फराळ' सगळ्यांच्याच अंगावर आला होता. पेपर वाचता वाचता डुलकी लागली होती पण पाच वाजता खालच्या देवळात 'पुंडलिक वरदे हाऽऽरी विठ्ठल' च्या गजराने जाग आली. फराळ जास्त झाल्याने डोळे उघडत नव्हते. आजूबाजूला नजर टाकली तर यांची डोळ्यावर चष्मा ठेऊन, मुलगी छातीवर तसेच पुस्तक ठेऊन, सासुबाई सोफ्यावरच सगळ्यांचीच विकेट पडली होती. पूर्वी मी आणि सासुबाई दोघीच एकादशी करायचो. पण सगळ्यांनी एकादशीला संकल्प सोडला आणि एकेकाला उठवताना मला कमरेवर हात ठेऊन ओरडायची पाळी आली.

**सौ. वंदना प्रसादे**
ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४० ०६५२

...



# यशासाठी काही टिप्स

- कष्टाशिवाय काही मिळत नाही, सतत कष्ट करणारी माणसेच यशस्वी होतात.
- यश हे फक्त पैशात मोजायचे नसते तर खरे यश पैशापलीकडेच असते.
- 'प्रॅक्टीस मेक्स् मॅन परफेक्ट' हे कधीही विसरू नका.
- आपले ध्येय नेहमी उच्च असावे ते मिळविण्यासाठी आपण झटून काम करावे.
- वेळेचे नियोजन न करणारा माणूस अयशस्वी ठरतो. त्यामुळे वेळेचे काटेकोर नियोजन करा. उद्याचे काम आज कसे करता येईल त्याचा विचार करा.
- दुसऱ्या माणसाला, प्राण्यालाही मन असते. कोणाचे ही मन दुःखवू नका.
- मान मागून मिळत नसतो, तशी पात्रता असावी लागते.
- आपले व्यक्तिमत्त्व चांगले होण्यासाठी चांगले पहाणे, चांगले ऐकणे व चांगले वाचणे महत्त्वाचे असते.
- वाईट संगत पटकन लागते लक्षात ठेवा, माणसाची पारख त्याच्या मित्रांवरून होते. त्यामुळे आपले मित्र चांगलेच असायला हवेत.
- मला हे जमणार नाही, मी हे कसे करू असे नकारात्मक विचार करू नका.
- स्वतःतील आत्मविश्वास वाढवा, यश तुमचेच आहे.

# आंतरराष्ट्रीय पर्वत वर्ष व एव्हरेस्ट मोहिमेचा सुवर्णमोहत्सव - २००२

पर्वतमित्र श्री. अरुण ठाकूर यांचे एक भाषणात व्यक्त झालेले मनोगत. - संपादक

व्यासपीठावरील सर्व सन्माननीय व आदरणीय पाहुणे आणि दालनातील गुणीजन गिरीमित्रांनो - आपण सारे डोंगरभाऊ आहोत ....

आजचा दिवस हा अत्यंत भाग्याचा दिवस आहे. आंतरराष्ट्रीय पर्वत वर्ष व एव्हरेस्ट चढाईच्या यशस्वी मोहिमेच्या सुवर्णमोहत्सवा निमित्ताने आजचे गिरीमित्र संमेलन होत आहे. त्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन व धन्यवाद !

मनुष्य हा साहसप्रिय आहे. नवनवीन काही निराळे करावे असे त्याला नेहमीच वाटत असते. ही प्रवृत्ती कमीअधिक प्रमाणात प्रत्येकात आढळते. अशा प्रवृत्तीला जेव्हा साहसाची जोड लाभते त्यावेळी अशक्य कोटीतील वाटणारे काहीतरी घडून येते. मानवी प्रगतीमागील ही खरी प्रेरणा आहे.

गती हा सृष्टीचा मूलभूत भाव असून त्या सृष्टीचा एक भाग असलेल्या मानवाची ती प्रेरणा आहे. हीच प्रेरणा मानवाला साहसांना प्रवृत्त करीत असते. मानवाची ही अदम्नीय प्रेरणा शृंखलाबद्ध करता येत नाही. यामुळेच 'साहसे श्रीः प्रतिवसति' असे म्हणतात.

निसर्गाचा सहवास हा माणसाच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. आपले व्यक्तिमत्त्व उठावदार करण्यास, तसेच रोजच्या धकाधकीच्या जीवनातून मुक्तानंद मिळविण्याचा मार्ग म्हणजेच निसर्गसहवास !

या माझ्या सह्याद्रीमध्ये असलेली झाडे-पाने, फुले-फळे, पक्षी-प्राणी, साप-कीटक, दगड-धोंडे, कडे-कपाऱ्या, डोंगर-किल्ले, वारा-पाऊस आणि तेथील आदिवासी हे सारे माझे शिक्षक आहेत. त्यांनी मला शहाणे केले. या मायावी जगात मोहापासून दूर रहावयास शिकवले. दुसऱ्याची अडवणूक करुन मिळणाऱ्या सुविधा व सवलतींचा हाव मनांत उत्पन्न न होण्याची ताकद मला दिली. चांगल्या विचारांची सुंदर मालिका दिली. व्यसनांपासून दूर ठेवले. सौंदर्याची जाणीव असलेली दृष्टी दिली. मानवनिर्मित जातीयतेची कोती वृत्ती झटकून टाकण्याचे बळ दिले. आलेल्या कुठल्याही प्रसंगाला निधड्या छातीने सामोरे जाण्याचे सामर्थ्य दिले. सहनशीलतेची अमर्याद बळकटी दिली आणि या आनंदभुवनी कोणावरही निष्काम प्रेम करण्याची हिम्मत दिली. जीवनावर प्रेम करायला शिकविले. म्हणूनच 'सह्याद्री हे माझे विद्यापीठ आहे' असे मी मानतो.

मातीवर देखील जीवापाड प्रेम करणारी माणसे असतात. सह्याद्रीमधील आदिवासींमध्ये हेच दिसून येते. प्रचंड कष्ट उपसणारे, प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारे, केवळ जिवंत आहोत म्हणून कसेबसे अर्धपोटी जगणारे, जगाशी कसलाच संबंध नसणारे आणि सुशिक्षित समाजाकडून दुर्लक्षित असलेले हे आदिवासी.. त्यांच्या पाचवीलाच पुजले आहे भीषण दारिद्र्य ! तरी पण हे त्यांच्यातील माणूस जिवंत आहे. सह्याद्रीतील भ्रमंतीमध्ये एक लक्षात आले. आपण स्वातंत्र्य उपभोगत असलो तरी त्यांच्यामार्फत कुठलीच गोष्ट पोचत नाही. या साऱ्या परिस्थितीचा विचार करुन आदिवासींसाठी काही काम करण्याची कल्पना मी आमच्या मित्रमंडळींसमोर मांडली. तिला आकार देता देता उभी राहिली ती ' राजमाची ग्रामसहाय्य योजना'! कुठल्याही पक्षाचा, संघटनेचा वा

सरकारचा आधार न घेता पूर्ण स्वबळावर गिरिभ्रमणातून निर्माण झालेला हा प्रकल्प महाराष्ट्रातलाच नव्हे तर भारतातील एकमेव प्रकल्प म्हणून नावारुपास आला होता. दहा वर्षे याचे काम अत्यंत शिस्तबद्ध चालू होते. सर्व क्षेत्रातील व संस्थातील लोक यात आपणहून सहकार्य देत होते.

काम करणारी माणसे वेगळी अशी अवस्था निर्माण झाली. लक्षात आणून देऊन सुद्धा संस्थेच्या कार्यकारी मंडळानेही या साऱ्या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. हा प्रकार सर्वांच्या लक्षात आल्यामुळे व मूळ उद्देश सोडून दिल्यामुळे आता ही संस्था पूर्णपणे बंद झाली आहे.

यातून एक गोष्ट निश्चित लक्षात येते ती म्हणजे मनापासून व मन लावून काम केले तर नक्कीच चांगला आदर्श उभा करु शकते. पण त्यात सावधनता बाळगावयास हवी.

मनुष्यरुप हे निसर्गाचे आपल्याला मिळालेले वरदान आहे. त्याचा योग्य प्रकारे उपयोग करणे आपल्याच हातात आहे. प्रथम केवळ हाईक किंवा ट्रेक या नावाने फिरताफिरता निसर्गातील अनेक विभागाची दालने आपल्यासमोर उघडी होऊ लागतात. त्यात काही आश्चर्यकारक घटनाही घडत असतात. त्या विविक्षित क्षणी आपण तेथे हजर असलो तर त्या घटना अनुभवास येतात. निसर्गात फिरताना, निसर्ग न्याहाळताना अनेक गोष्टी हळू हळू आपल्या नजरेत येऊ लागतात... आणि मग लक्षात येते की केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवाचे ज्ञान फार मोठे असते.

झाडे आपल्याशी बोलताना असे एक लेखक-कवी तत्त्वज्ञानी श्री. रविंद्रनाथ टागोर सांगून गेले. निसर्गाशी संबंध येत गेला, निसर्गात सातत्याने फिरणे सुरु झाले तेव्हा काही वर्षानंतर या वाक्याची सत्यता अनुभवास येऊ लागली. झाडे आपल्याशी बोलतात याची जाणीव आपल्याला जेव्हा होते व नंतर त्यांच्याशी सुसंवाद साधण्यात आपण जेव्हा मग्न होतो, तेव्हाच आनंदाला खरी सुरुवात होते. किल्ले दर्शनाने आपल्या पूर्वजांचा खरा इतिहास समजण्यास सुरुवात होते.

सृजनांचा चैतन्यमयी उत्सव असलेले आणि असूर-सुरावृत्तींचा नाश करणारे भ्रमंतीचे व्रत आज मात्र डोकेदुखी ठरणाऱ्या रुपात साजरे होऊ लागले आहे. यात व्यक्तीमत्वाचा ऱ्हास व आपल्याबरोबर दुसऱ्याच्याही इज्जतीचा पंचनामा घडवून आणण्याचे वळ वाढते आहे. संघवृत्तीने खतपाणी घालण्याचे प्रयत्न आतील स्तरावरुन होत आहेत, मूळ हेतू बाजूला राहुन नियमांचे यच्चयावत उल्लंघन सर्रास चालू आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. हे असेच दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधायला हवा, तरच आपण हे पर्वत वर्ष व एव्हरेस्ट मोहिमेचा सुवर्णमोहत्सव साजरा करण्यास लायक ठरु.

गिरिमित्रांनो, डोंगर तुम्हाला साद घालीत आहे. त्यांच्या हाकेला ओऽद्या, तेव्हा चला.. उत्तर-दक्षिण उभा असलेला सह्याद्रि पूर्व-पश्चिम आपले असंख्य बाहु पसरुन तुम्हाला बोलावतो आहे.. खेळायला बोलावतो आहे.. त्याच्या अंगाखांद्यावर खेळायला चला!

**पर्वतमित्र -श्री. अरुण ठाकूर**

**पर्वत वर्षनिमित्ताने भारतातील पर्वत रांगांची माहिती आपण दिशासाठी पाठवू शकता.**



# पारिभाषिक शब्दांचा अर्थ

*माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात वारंवार वापरले जाणारे शब्द, त्यांचे अर्थ यांची कल्पना यावी या दृष्टीने ही संकलित यादी. असे पारिभाषिक शब्द वापरताना त्यांचा अर्थ माहीत व्हावा हा त्यामागील उद्देश आहे या विषयाप्रमाणेच जीव तंत्रशास्त्रातील पारिभाषिक शब्द देण्याचा आमचा मानस आहे- संपादक*

**Protocol - प्रोटोकोल**

विशिष्ट कार्य करण्यासाठी निश्चित केलेले नियम.

**Posting - पोस्टींग**

बुलेटिन बोर्डवरील संदेश.

**Read me file - रीड मी फाईल**

विशिष्ट प्रोग्रॅम संगणकात संग्रहित करण्याआधी त्या प्रोग्रॅम संबंधीची माहिती करून देणारी फाईल.

**ROTFL- आर् ओ टी एफ् एल्**

Rollling on the floor laughing या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर गडबडा लोळायला लावणारा विनोदी संदेश.

**Router- रुटर**

दोन नेटवर्कमध्ये सांधा जुळविण्याच्या खास कार्यासाठी तयार केलेला संगणक.

**Search Engine - सर्च इंजिन**

वेबवरील पाहिजे ती माहिती शोधून देणारा प्रोग्रॅम.

**Server - सर्व्हर**

विशिष्ट माहिती पुरविणारा प्रोग्रॅम.

**Share ware - शेअर वेअर**

काही काळ नि:शुल्क वापरता येणारा प्रोग्रॅम, परंतु हा प्रोग्रॅम कायमचा हवा असल्यासा त्यासाठी शुल्क द्यावे लागते.

**Slip - स्लीप**

सिरीयल लाईन इंटरनेट प्रोटोकोल. तुमच्या व सर्व्हिस प्रोव्हायडरच्या अशा दोघांच्या कॉम्प्युटरवरच असेल तर तुमचा कॉम्प्युटर केवळ पडदा, केवळ मॉनिटर, केवळ एक टर्मिनल न बनता तो जणू खुद्द इंटरनेटचाच भाग बनतो. तुम्ही मग Telnet किंवा FTP ने इतर कॉम्प्युटरशी संपर्क साधू शकाल.

**Smiley- स्माइली**

बाजूने पाहिल्यास चेहरा आहे असे वाटणारी चिन्हांची मांडणी. उदाहरणार्थ : परस्परांशी संपर्क साधताना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी निश्चित केलेले चिन्हांचे आकृतीबंध.

**Snail Mail - स्नेल मेल**

परंपरागत पोष्ट खात्याकडून होणारे पत्राचे वितरण.

**Surf - सर्फ**

इंटरनेटवर निरुद्देश भ्रमंती. मौजेसाठी इंटरनेटवरील माहितीचा शोध.

**Surf Watch - सर्फ वॉच**

हा प्रोग्रॅम इंटरनेट अकौंट सेंसॉर करतो. आपली मूलं इटरनेटवर काय पाहतात ते तपासू इच्छिणाऱ्या आईबापाना उपयोगी असे हे सॉफ्टवेअर आहे.

**Sysop - सायसॉप**

बुलेटिन बोर्ड सिस्टिमचा व्यवस्थापक.

**Talk - टॉक**

वर्तमानकाळात संदेशांचे आदानप्रदान. आदानप्रदान करणाऱ्या व्यक्ती संदेश टाइप करून परस्परांशी बोलतात.

**Tcp/IP - टॉप/आय पी**

Transmission Control Protocol /Internet Protocol या शब्दांचे संक्षिप्त रुपांतर, या पद्धतीत १०० पेक्षा जास्त प्रोटोकोल्स आहेत. संगणक आणि नेटवर्कस् साधण्यासाठी वापरली जाणारी प्रणाली.

**Text File - टेक्स्ट फाईल**

केवळ मजकूर देणारी कॅरेक्टर्स जिच्यात वापरली गेली आहेत (Graphic, Pictures etc. नाहीत) ती Text File. फाईलचा दुसरा प्रकार म्हणजे बायनरी फाईल होय. केवळ मजकूराचीच असल्याने कुठल्याही कॉम्प्युटरवर चालते.

**TV - टीव्ही**

एकच कार्यक्रम सर्वांच्या TV कडे TV केंद्र पाठवतात म्हणून TV हे एक दिशामार्ग असलेले प्रसार माध्यम आहे. या उलट इंटरनेटवर दोन कॉम्प्युटर दोन्ही दिशांनी माहिती पाठवू शकतात. म्हणजेच इंटरनेट हे दुहेरी दिशा असलेले प्रसार माध्यम आहे.

**Tel net - टेल नेट**

दूरच्या संगणकाशी तुमचा संगणक जोडण्यासाठी निर्माण करण्यात आलेली सेवा.

**Unix - युनिक्स**

युनिक्स पद्धत मागे पडत चालली होती. पण इंटरनेटचा शोध लागल्यावर युनिक्सला परत चांगले दिवस आले आहेत. जे कोणी सर्व्हिर प्रोव्हायडरची शेल-अकौंट सेवा घेतात त्यांना युनिक्स देवदूत वाटते.

**Unzip - युनझिप**

संकुचित करण्यात आलेल्या फाईलचा विस्तार

**Upload - अपलोड**

तुमच्या संगणकावरील माहिती दूरच्या संगणकाकडे पाठविणे.

**Usenet - यूजनेट**

हजारो बुलेटिन बोर्डस् उर्फ न्यूज ग्रूप्स जोडणारी यंत्रणा (यूजनेट साईटचे नियंत्रकाला Administrator हे नाव आहे.)

**UDP - यूडीपी**

यूजर डेटाग्रॅम प्रोटोकोल, पॅकेजमध्ये नको असलेली माहिती हुडकणारी सिस्टिम.

**URL - यू आर एल**

Uniform Resource Locater या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर. इंटरनेटवरील विशिष्ट माहितीच्या स्थानाचे तांत्रिक वर्णन.

**Veronica - व्हेरोनिका**

गोफर स्पेस मध्ये काम करायला हा प्रोग्रॅम उपयोगी. तसेच Archie साठी ही उपयोगी.

**Virous - व्हायरस**

हा शब्द म्हणजे तुमच्या वस्तू. तुम्ही केवळ अधिकृत कंपन्यांच्याच का घ्याव्यात ह्याचा धडा देणारा थोडा महाग शिक्षकच होय. हे एक सॉफ्टवेअर इनफेक्ट करणारे सॉफ्टवेअर आहे. ज्या सिस्टिमवर हे सॉफ्टवेअर "रन" केलं जाईल ती सिस्टिम खराब करायचं, Infected करावयाचे ह्याचे काम आहे. तेव्हा नव Software तुमच्या कॉम्प्युटरवर करून घेताना प्रथम काळजी घ्या की जे नव म्हणून तुम्ही आणलयं हे Original आहे. नकली मालापासून सावध!

**WEB/WWW - वेब किंवा डब्लू डब्लू डब्लू**

World Wide Web म्हणजे जगातील सर्व माहितीचा साठा, ज्ञानाचे जागतिक जाळे, माहितीचे जागतिक गोडाऊन वगैरे वगैरे.

**WEB Software - वेब सॉफ्टवेअर**

अनेक व्यक्तींनी निर्मिलेल्या एकूण इंटरनेट सॉफ्टवेअरचा उल्लेख या संज्ञेने करतात.

**WEB Croller - वेब क्रॉलर**

क्रॉलर म्हणजे रांगणे, वेबमधून हिंडणारा प्रोग्रॅम, फुकट उपलब्ध असलेल्यापैकी एका प्रोग्रॅमचे हे नाव आहे. तुमच्या आवडीच्या विषयातला विशिष्ट शब्द घ्या. तो शब्द घेऊन वेब क्रॉलर तो शब्द जेथे जेथे असेल त्या, त्या फाईल्सची यादी देईल.

**WAN - वॅन**

WAN Area Network या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर

**WAIS - डब्लू ए आय् एस्.**

Wide Area Information Serviece चे संक्षिप्त रुपांतर. इंटरनेटवर संग्रहित केलेल्या डाटाबेसमधून तुम्हाला पाहिजे ती माहिती त्वरेने शोधून देणारी सेवा.

**Zacnet Card - झॅकनेट कार्ड**

हे मायक्रोचिप कार्ड आहे. हे कार्य वापरुन माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेचा वेग प्रचंड वाढतो. कारण माहिती टेलिफोन मार्फत न येता थेट सॅटेलाईट टिव्हीच्या डीस्क्स मार्फत तुमच्या कॉम्प्युटरात येते. झॅकनेट कार्ड फायदेशीर आहे. पण हे कार्ड घेऊन टेलिफोन सुद्धा घ्यावा लागतोच. कारण ह्या कार्डाला जी कमांड जाईल ती टेलिफोन माध्यमातूनच जाणार.

**Zip File - झिप फाईल**

माहितीचे आकुंचन करण्यात आलेली फाईल. ही फाईलै वापरण्यापूर्वी ती अनझिप करावी लागते. म्हणजेच तिच्या मधील माहितीचे मूळ स्वरुपात विस्तार करावा लागतो.

(वरील यादीतील शब्दांखेरीज खूप शब्द या विषयाच्या अभ्यासात भेटण्याची शक्यता आहे. यासाठी एक चांगलीशी कॉम्प्युटर डिक्शनरी संग्रही ठेवावी.)

(स्पर्धा -डिसेंबर १९९९ वरून साभार)

---

## इंटरनेटचे मार्गदर्शन करणारे काही संदर्भ ग्रंथ


1. The Internet complete reference : Harley Hahn
2. Mastering the Internet : Glee Cady, Pat McGregor
3. The Internet, Basic Reference from A to Z : Bennett Falk
4. Internet, Instant Reference : Paul Haffman
5. Everybody's Guide to the Internet : Adam Gaffin
6. Teach yourself the Internate in a week : Neilo Randall
7. Internet and World Wide Web Simplified : Ruth Maran
10. Learning to use the Internet : Ernest Ackermann
11 The Internet for Dummies : John Levine & Lord Baroud.
12. The Internet Navigator : Paul Glister
13. The whole Internet User's Guide and Catalog : E. D. Krol, O'Reilly
14. Natguide : Peter Rutlen, Albert Bayors & Kelly Haloni.
15. Internet Starter Kit : Adam Engst.
16. Navigating the Internet : Mark Gibbs & Richard Smith
17. Cruising on Line : Lawrence Magid
18. Internet Guide for new users : Daniel Dern
19. How the Internet Works : Joshua Eddings.

# परिसर वार्ता

## वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे टॉपर विद्यार्थी -

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने मे २००२ मध्ये घेतलेल्या परीक्षांचे निकाल अलीकडेच जाहीर झाले. आमच्या तंत्रनिकेतनातील प्रत्येक वर्षाच्या विविध विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकालाच्या दिवशी तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सी. श्री. मुजुमदार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. या प्रसंगी तंत्रनिकेतनचे उपप्राचार्य डी. के. नायक, प्रा. सौ. वडेर, प्रा. विद्याधर बालावलकर व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक उपस्थित होते.

सत्कार करण्यात आलेले विद्यार्थी त्यांचे विषय टक्केवारी पुढीलप्रमाणे -

### प्रथम वर्ष

| | | |
|---|---|---|
| आय. एस् | वालेचा , रोहित | ७५.५३% |
| इपी | झिंगारे, श्रेयस | ७४.६१% |
| आय. एफ् | शेख, आसीम | ७३.८४% |
| सी. एच् | दुर्वे, अमेय | ७०.१५% |
| आय. इ | शेवडे, ओंकार | ६७.६१% |

### द्वितीय वर्ष

| | | |
|---|---|---|
| आय. इ | लाहाकर , संगीत | ८०.३१% |
| आय. एस् | लाड, अनिकेत | ७६.३१% |
| इपी | ओक, अमेय | ७०.८४% |
| सी. एच् | सतरा, अमित | ६४.९५% |

### तृतीय वर्ष

| | | |
|---|---|---|
| आय. इ | नारकर, कीर्ती | ८५.१४% |
| आय. एस् | कमलापुरकर, हर्षदा | ८१.७१% |
| सी. एच् | कदम, विजय | ६४.९५% |
| इपी | दुवल विनय | |



उभे डावीकडून - कीर्ती नारकर - IE.
विनय दुवल - EPS
बसलेले डावीकडून- श्री. मोहन पाठक (ग्रंथपाल बांदोडकर महाविद्यालय), प्राचार्य श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक, विभाग प्रमुख - सौ. वडेर निशा

## कीर्ती नारकर विशेष उल्लेखनीय -

तृतीय वर्षातील प्रथम आलेली कीर्ती नारकर हिचे यश विशेष उल्लेखनीय आहे. महाराष्ट्राच्या तंत्र शिक्षण मंडळाच्या गुणवत्ता यादीत ती १६ वी आली आहे.

महाराष्ट्र विद्यालयातून ती दहावीला असताना गुणवत्ता यादीत २३ वी आली होती. प्रथम वर्ष तंत्रशास्त्रात इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्सच्या पदविका परीक्षेत ती

तंत्रनिकेतनात ७८.२७% गुण मिळवून पहिली आली होती. द्वितीय वर्ष तंत्रशास्त्रात इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स पदविका परीक्षेत ७९.७१% मिळवून पहिली आली होती व यंदा तृतीय वर्षातही तिने ८५.१४% गुण मिळवून प्रथम क्रमांक कायम ठेवला आहे.

कीर्तीला यानंतर पदवी परीक्षेच्या द्वितीय वर्षात प्रवेश घ्यावयाचा आहे. विशेष म्हणजे तिच्या भावानेही असेच यश याच तंत्रनिकेतनात असताना मिळवले होते.

प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, उपप्राचार्य डी.के नायक यांनी कीर्तीचे विशेष अभिनंदन करून भविष्यासाठी तिला शुभेच्छा दिल्या.



**कु. कीर्ती नागकर चे अभिनंदन करताना प्राचार्य श्री. मुजुमदार (कीर्ती बोर्डात १६ वी आली आहे.)**

**ठाण्यात प्रथमच ग्रंथालयशास्त्र निष्णात परीक्षा वर्गाची सोय -**

''ग्रंथालय सेवा ही अतिशय महत्त्वाची सेवा असून या सेवेसाठी ग्रंथपालाने स्वतः एक संस्था व्हायला हवे. वाचन, व्यासंग सातत्याने वाढवला पाहिजे'' असे उद्गार विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात बोलताना काढले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या निष्णात परीक्षेच्या वर्गाच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात या केंद्राचे संयोजक व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांच्या प्रास्ताविकाने झाली. या वर्गाचे उद्घाटक, रामभाऊ म्हाळगी, प्रबोधिनीचे मानद संचालक श्री. विनय सहस्त्रबुद्धे यांचा परिचय बेडेकर जोशी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी करून दिला. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य व सदर केंद्राचे केंद्रप्रमुख प्राचार्य सी. जी. पाटील आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे सदर अभ्यासक्रमाचे मानद संचालक डॉ. शरद गणपुले यांनीही या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

''ग्रंथपालनाचे तंत्र आत्मसात करतानाच विद्यार्थ्यांनी ग्रंथपाल सेवेचा मंत्रही आत्मसात करावा. अशी अपेक्षा व्यक्त करून श्री. विनय सहस्त्रबुद्धे यांनी वर्गाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले.

सदर उद्घाटन समारंभास विद्याप्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष मा. य. गोखले, महाविद्यालयाच्या पदवी विभागाच्या उपप्राचार्य डॉ. सौ. माधुरी पेजावर, मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागाचे संचालक प्रा. चंद्रकांत भोंजाळ, ग्रंथालय शास्त्रातील तज्ज्ञ प्रा. प्रदीप कर्णिक, डॉ. द. ना. फडके, डॉ. हिंदुराव वायदंडे, प्रा. महेश दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या संयोजनासाठी प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष कष्ट घेतले. कार्यक्रमाचा समारोप ग्रंथालय सहकारी श्री. शरद लवित यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाला.

**प्रा. मोहन पाठक.**